बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.४ सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक३४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार

मुंबई:राज्यात सध्या लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरले जात आहेत. दोन कोटीहून अधिक महिलांना या योजनेसाठी पात्र ठरवण्यात आलं आहे. मात्र, या योजनेच्या अर्जप्रक्रियेदरम्यान गैरप्रकार झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. साताऱ्यात एका व्यक्तीने ३० जणांच्या आधार कार्डचा गैरवापर करून तब्बल ३० अर्ज भरले आहेत. तर पनवेलमध्ये व्यक्तीने एका महिलेचा वेगवेगळ्या पोशाखात फोटो वापरून अर्ज भरला आहे. दरम्यान, या घटनानंतर आता गैरप्रकार करणाऱ्यांना थेट मुख्यमंत्र्यांनी इशारा दिला आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्यांना या घटनांबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी असून यात गैरप्रकार करणाऱ्यांना तुरुंगात टाकलं जाईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# एक हजार कामगार संपावर!

## आंदोलन : लालपरीच्या पाचशे फेऱ्या रद्द, दैनंदिन २२ लाखांचे नुकसान

धाराशिव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य परिवहन मार्ग महामंडळाच्या धाराशिव विभागातील कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकदा संपाचे हत्यार उपसले आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात अनन्य साधारण महत्व असलेल्या ग्रामीण भागातील वाहिनीची चाके कामगारांच्या संपात रूतल्याने सामान्यांसह आगारांचेही लाखो रूपयांचे बुडाले आहे. जिल्ह्यातील सहा आगारांतून दररोज सव्वा सहाशेवर बसगाड्यांच्या नियोजित फेर्या रद्द झाल्याने पहिल्याच दिवशी २२ लाख रूपयांचा फटका महामंडळाला बसला आहे.राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यस्तरीय कामगार संघटनेच्या कार्यकारिणीची १४ ऑगस्ट रोजी बैठक घेवून कामगारांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी राज्य सरकारला २७ ऑगस्टपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी कामगारांच्या जिल्हास्तरीय कार्यकारिणीने निदर्शने करून ३ सप्टेंबरपासून एसटी महामंडळ कामगार संपावर जाणार असल्याचा इशारा दिला होता. तरीही राज्य सरकारकडून कामगारांच्या मागण्यांची दखल घेण्यात न आल्याने त्याचा विपरीत परिणाम एसटी महामंडळाच्या दैनंदिन कामावर झाला. शुक्रवारी चालक, वाहक व अन्य कामगार कामावर आले



नाहीत. त्यामुळे बस आगाराच्या बाहेर आली नाही.धाराशिव जिल्ह्यात धाराशिव, उमरगा, भूम, तुळजापूर, कळंब व परंडा हे सहा आगार आहेत. धाराशिव आगारातून दररोज १२० नियोजित फेर्या होतात. पैकी मंगळवारी सकाळी १७ फेर्या झाल्या. त्यानंतर चालक, वाहक संपात सहभागी झाले. उमरगा आगाराच्या ११७ नियोजित फेर्या होत्या. पैकी दोनच गाड्या धावल्या. भूम आगाराच्या १०० नियोजित फेर्यांपैकी केवळ चारच फेर्या झाल्या. तुळजापूर आगारातून ९५ नियोजित फेर्यांपैकी २१ फेर्या, कळंब आगाराच्या १५८ नियोजित फेर्यांपैकी ६६ तर परंडा आगारातून दररोज धावणार्या ४४ नियोजित बसगाड्यांच्या फेर्यांपैकी केवळ १२ फेर्या झाल्या. कामगारांच्या संपाचा धाराशिव विभागावर चांगलाच परिणाम झाला असून एकूण ६३४ नियोजित फेर्यांपैकी केवळ १२२ फेर्या झाल्या तर ५१२ फेर्या रद्द झाल्या. दररोज ६३४ गाड्यांचे ९८ हजार ६८६ किलोमीटर होते. पैकी ८१ हजार ५०० किलोमीटरच्या फेर्या रद्द झाल्या आहेत. यामुळे सहाही आगाराचे एकूण २२ लाखांचे उत्पन्न बुडाले आहे.

### आगारनिहाय रद्द झालेल्या फेऱ्या व बुडालेले उत्पन्न

धाराशिव आगारातून १०३ फेर्या रद्द झाल्या बसफेर्यांतून मिळणारे पाच लाख ४८ हजारांचे संभाव्य उत्पन्न बुडाले आहे. उमरगा आगाराच्या ११५ फेर्या रद्द झाल्याने दोन लाख १९ हजारांचे उत्पन्न बुडाले, भूम आगाराच्या ९६ फेर्या रद्द झाल्याने दोन लाख ७८ हजारांचे उत्पन्न बुडाले, तुळजापूर आगारातून ७४ फेर्या रद्द झाल्या असून सहा हजार ७७ हजार रूपयांचे उत्पन्न बुडाले आहे, कळंब आगारातून ६६ फेर्या रद्द झाल्या असून कळंब आगाराला सव्वा तीन लाखाचा फटका बसला आहे. परंडा आगारातून पहिल्या दिवशी ३२ फेर्या रद्द झाल्या असून दीड लाख रूपयांचे उत्पन्न बुडाले आहे. एकंदरीत धाराशिव विभागातून पहिल्या दिवशी ५१२ बसफेर्या कामगारांच्या संपामुळे रद्द झाल्यामुळे एकूण २२ लाखांचे उत्पन्न बुडाले आहे.



# जुन्या घटनेतून युवकाचा खून!

## खळबळ:पोलिस अधीक्षक कार्यालय समोर अक्रोश

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पांढरवाडी येथे जुन्या घटनेचा राग मनात धरून मंगळवार दि.०३ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास गावाच्या बाहेर भररस्त्यावर एका २४ वर्षीय युवकाच्या अंगावर दिवसाढवळ्या चाकूने सपासप वार करून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. दिवसाढवळ्या खून झालेल्या युवकाचे नाव बालाजी घरगुडे (वय २४ वर्षे) रा.पांढरवाडी, ता.गेवराई असे असून या घटनेने गेवराई तालुक्यात खळबळ उडाली आहे.

या घटने प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्याचे सपोनी सोमनाथ नरके यांना पांढरवाडी येथील गावकऱ्यांनी माहिती दिली असता त्यांनी तात्काळ पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल कोळी, उपनिरीक्षक संदिप नेवरे, पोलिस हवालदार नारायण काकडे, पोलिस हवालदार महेश झिकरे, पोलिस हवालदार विठ्ठल राठोड, बीट अंमलदार हनुमान जावळे, वाहन चालक बागलाने यांना पाठवून घटनास्थळाची पाहणी व पंचनामा केला आहे. धारदार शस्त्राने दिवसाढवळ्या वार झालेल्या युवकाला त्याच्या नातेवाईकांनी बीड जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. परंतु वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. खून झालेल्या युवकाचे शवविच्छेदन करण्यास नातेवाईकांनी विरोध केला असून आधी आरोपीला अटक करा मगच शवविच्छेदन करा अशी मागणी मयताचे नातेवाईक पान २ वर...

# परळी येथील पूरग्रस्तकरांच्या भेटीला

## धनंजय मुंडे: नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज परळी शहरात सोमवारी झालेल्या पावसाने पुराचे पाणी शिरलेल्या विविध भागांमध्ये भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. पूरग्रस्त नागरिकांना भेटी देत चर्चा करून धनंजय मुंडे यांनी नागरिकांना दिलासा दिला. यावेळी पुरामुळे घरात पाणी शिरून झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनास दिले.

मागील दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सरस्वती नदीस मंगळवारी सकाळी पूर येऊन नदीकाठच्या अनेक वस्त्यांमधील घरामध्ये पाणी शिरले होते. अंबेवेस भागासह अनेक गल्लीत पाणी शिरले होते. या पाण्यातून मार्ग काढीत राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी दुपारी शहरातील पूरग्रस्त भागात भेट देऊन तेथील नुकसानग्रस्त नागरिकांची कैफियत ऐकून घेतली व नगरपालिका प्रशासनास स्वच्छता करून व तेथील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या. घरात पाणी शिरून धन-धान्याचे नुकसान झालेल्या नागरिकांना तहसील मार्फत तात्काळ आपत्ती पान २ वर...



# पाच विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी

## पंकजा मुंडे: चिंचवड येथून केली आढावा दौऱ्याची सुरवात



पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी


आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा आ. पंकजाताई मुंडे यांच्यावर भाजपने पुण्यातील पाच विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपवली आहे. त्या अनुषंगाने आजपासून त्यांनी या मतदारसंघाचा आढावा दौरा सुरू केला असून आज चिंचवड येथे मतदारसंघातील भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा आपणच

# रशियाचा युक्रेनवर पुन्हा क्षेपणास्त्र हल्ला

## विकोप: पोल्टावामधील लष्करी शिक्षण संस्थेला केलं लक्ष्य

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

रशियाने मंगळवारी पुन्हा एकदा युक्रेनवर दोन क्षेपणास्त्र डागली आहेत. युक्रेनच्या पोल्टावा शहरावरील लष्करी संस्थेवर हा हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात ५० नागरिकांचा मृत्यू झाला असून २७१ नागरिक गंभीर जखमी झाल्याची माहिती युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी दिली आहे. सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करता त्यांनी या हल्ल्याला रशियावर जबाबदार असल्याचा आरोप केला आहे.पोल्टावामध्ये राशियाने हल्ला केल्याची माहिती



मला मिळाली आहे. लष्करी शिक्षण संस्थेला रशियाकडून लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यात इमारतींचही मोठं नुकसान झालं आहे. यात दुर्दैवाने ५० नागरिकांचा मृत्यू झाला असून २७१ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याला रशिया जबाबदार आहे. असं झेलेन्स्की यांनी शेअर केलेल्या व्हिडीओत म्हटलं आहे.दरम्यान, युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या महितीनुसार, या हल्ल्यामुळे या भागातील

# नितेश राणेंची वाचाळ बोलती बंद करा

## निवेदन: शेख तय्यब यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राचा धर्म कोणता? या प्रश्नाचं उत्तर स्वत:च्या धर्माच्या स्वाभीमान बाळगण्याबरोबर अन्य धर्माचा आदर करणे असे येते. हे साधू-संत-सुफींसह समाज सुधारकांनी आम्हाला सांगितले. परंतु गेल्या काही वर्षात महाराष्ट्र धर्मच बाटवण्याचं काम काही राजकीय वाचाळविरांकडून केला जात आहे. प्रामुख्याने भाजपा आ. नितेश राणे हे जाणीवपुर्वक दोन जातींमध्ये आणि धर्मांमध्ये तेढ निर्माण होईल, असे वक्तव्ये करत आले आहेत. राणेंच्या वाचाळ बडबडीला ब्रेक लावण्याचे काम भाजपाने करावे अन् मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी धार्मिक तेढ निर्माण करू पाहणार्या लोकप्रतिनिधीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेख तय्यब यांनी केली आहे.



महाराष्ट्र हा साधू-संत-सुफींसह समाज सुधारकांची भूमी आहे. याच महाराष्ट्राने अठरापगड जातींना आणि धर्मांना एका माळेत गुंफण्याचे काम केले आहे. ती माळ म्हणजे या महाराष्ट्राचं स्वराज्य होतं. त्याच महाराष्ट्रात आता जात-पात-धर्म-पंथांवर भाष्य करून तेढ निर्माण केली जात आहे. स्वत:च्या धर्माचा गर्व बाळगत काही बोलघेवडे दुसर्याच्या धर्माचा अनादर करत आहेत. स्वत:च्या

गौरवास्पद | राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

# स्व.विनायकराव मेटेंना संसदपटू पुरस्कार!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे देण्यात येणारा महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा.आ. विनायकराव मेटे यांना जाहीर झाला मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांना मृत्यू पश्चात हा पुरस्कार देण्यात आला त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्काराची घोषणा होताच मंचावर उपस्थित मान्यवरांनी आणि सभागृहातील उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

विधिमंडळाच्या कामकाजातील नियमित सहभाग, विधिमंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन, विधिमंडळात उपस्थित करावयाच्या विषयांचे आकलन, उपस्थिती, विषय मांडताना वापरलेले ज्ञान, कौशल्य, निवडलेले मुद्दे, वक्तृत्व शैली, दर्जेदार उत्कृष्ट भाषणे या सर्व



गोष्टी पडताळून पाहून पुरस्कारांसाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीकडून या पुरस्काराची शिफारस केली होती. त्यानुसार राष्ट्रकूल संसदीय मंडळाकडून हा पुरस्कार जाहीर केला होता. शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा.आ. विनायकराव मेटे यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाल्याने बीड जिल्ह्यासह सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. तीस वर्षांच्या सार्वजनिक जिवनात मराठा आरक्षण, मुस्लिम आरक्षण, धनगर आरक्षण, अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय शिवस्मारकासाठी रस्त्यावरची लढाई लढतानाच विधीमंडळातही आक्रमक आणि अभ्यासू मांडणी करणाऱ्या दिवंगत लोकनेते पान २ वर...

### स्व.विनायकराव मेटे सदैव आठवणीत राहतील:मुख्यमंत्री

लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांना देखील आपण आज उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्रदान केला आहे. त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे ह्या या ठिकाणी पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये समाजासाठी खूप काम केलं परंतु दुर्दैवाने ते आज आपल्यात नाहीत. त्यांची आठवण आपल्या सोबत आहे आणि त्यांनी केलेले काम कायम आहे.

# निवडणुक तोंडावर गाजर दाखवू नका!

## बोंबला: मुंदडा कुटुंबाचे कुंबेफळमध्ये एमआयडीसीचे खोटे आश्वासन

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कुंबेफळ येथे एमआयडीसी होनार असे खोटे आश्वासन विद्यमान आमदार नमीता मुंदडा निवडणूक तोंडावर देत आहेत.निवडणुक झाली की त्या एमआयडीसीच्या प्रश्नाकडे डोकावून पहाण्यासाठी सुध्दा वेळ नसतो कारण त्या निवडून आल्या की आमदार नसतात तर कमीशन एजन्ट सारखे टक्केवारी घेण्यात व्यस्त असतात त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा यांनी ऐमआयडीसीचे खोटे आश्वासन देऊन जनतेची दिशाभूल करु नये असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे. केज विधानसभा मतदारसंघात असलेल्या केज शहरामध्ये अद्यापपर्यंत अनेकदा एमआयडीसी होणार म्हणून ऐकायला मिळालेले आहे. विशेष म्हणजे निवडणूक




काळात हा मुद्दा दरवेळी पटलावर येतो आणि निवडणुका झाल्या की परत थंडावतो म्हणून एमआयडीसीच्या बाबतीतलं हे पेल्यातलं वादळ किती दिवस गरम राहणार आणि पुन्हा नेमकं कधी थंड होणार यावर मतदारसंघात चर्चा सुरू असते.केज शहरामध्ये एमआयडीसी व्हावी म्हणून खूप दिवसांनी मागणी आहे परंतु मधल्या काळात केजच्या आमदार झाल्यानंतर देखील हा प्रश्न सुटलेला नाही. या परिक्षेत त्यांनाही पास होता आलेले नाही. सध्या केजच्या एमआयडीसी चा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. पिसेगाव आणि कु.बेफळ या ठिकाणी एमआयडीसी होणार असे अंबेजोगाईच्या आमदार सांगतात परंतु नेमकं निवडणूक सुरू झाल्यावरच का हा विषय व्हावा यामुळे यावर अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. कुंबेफळमधे पान २ वर...

## जोडे, खेटरे, पायताण, वहाणा, चप्पल इ.

मालवणात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यापासून राज्यातील राजकारण्यांच्या प्रतिभा आणि प्रतिमेचा दक्षिणेकडे सुरू झालेला कल्पनाविस्तार थांबण्याची काही चिन्हे दिसत नाहीत. पुतळा जमीनदोस्त झाल्याने या आपल्या राजकारण्यांची कल्पनाशक्ती ऊर्ध्व दिशेऐवजी अधरमुखीच झाली. कोण म्हणाले वाऱ्याच्या झुळकेने हा पुतळा पडला. कोणी जगात दर्यावर्दी गुणांसाठी ओळखल्या जाणाऱ्या नौदलास बोल लावले. कोणास आपले तारुण्य आठवून ते घरात घुसून मारण्याची भाषा करू लागले. कोणास त्यात काही शकुन दिसला आणि अधिक चांगले काही होण्यासाठी हे वाईट झाले असे वाटले. कोणी पुतळ्याची उंची १०० फुटी करण्याची भाषा करू लागला तर कोणास पुतळा पोकळ असल्याचा साक्षात्कार झाला. वास्तविक असा काही दुर्दैवी अपघात झाला की शब्दांचा अतिसार रोखण्याची तीव्र गरज असते. कारण मौन जे साधू शकते ते साध्य करण्याची क्षमता शब्दसेवेत नाही. अर्थात आपल्याकडील वाचाळवीरांस या उदात्त सत्याची कल्पना असणे अशक्यच. त्यातही; बुभुक्षित रानटी श्वापदास अचानक समोर लुसलुशीत मांसगोळ्याचे भक्ष्य आल्यावर जे वाटत असावे तशा आपल्या राजकारण्यांच्या समकक्ष भावना वाहिन्यांचे कॅमेरे पाहिल्यावर उद्दीपित होत असाव्यात. त्यामुळे सगळ्यांच्याच भाषाविश्वास बहर आला. विरोधकांची 'जोडे मारो' आंदोलनाची घोषणा हे त्याचेच फलित. यामुळे आपल्या नेत्यांस पाय (आणि जीभही) मोकळे करण्याची संधी मिळाली, इतकाच त्याचा अर्थ. खरे तर शरद पवार, पृथ्वीराज चव्हाण वा बाळासाहेब थोरात आदींनी जोडे मारण्याची भाषाही कधी केली असण्याची शक्यता नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी कोणास तरी जोडे मारण्याची प्रतीकात्मक का असेना; पण कृती करणे तसे अवघडच गेले असणार. या गोंधळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात असल्याची संधी साधली आणि पुतळा पडल्याबद्दल माफी मागून टाकली. पण या माफीने भावना शांत होण्याऐवजी त्यांचा अधिकच उद्रेक झाला. हे टाळता आले असते.

# बीड जिल्ह्यासह मराठवाड्यावर आस्मानीचा कहर!

## शेतकरी आक्रमक: तात्काळ नुकसान भरपाई देण्याची गरज

अशोक निपटे/बीड

निसर्गाच्या अवकृर्पेचा फटका पुन्हा एकदा शेतकऱ्यांना बसला आहे. बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने हाहाकार उडवून दिला आहे. सप्टेंबर महिन्याची सुरुवात मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी घातक ठरली असून ०१ सप्टेंबर पासून बीड जिल्हा आणि मराठवाड्यात पावसाने धिंगाणा घातला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेलं पीक, सोयाबीन, कापूस, कांदा, मुग यासारख्या पिकांचा नायनाट झाला आहे. आता जगायचं कसं आणि शेतात केलेल्या कष्टाचा मोबदला मिळवायचा कसा या चिंतेन शेतकरी हाताश झाला आहे. या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी मात्र शासन प्रशासनातील कोणताही अधिकारी कर्मचारी अद्याप शेतकऱ्यांच्या बांधावर पोचलेला नाही. मोठमोठ्या बढाया मारणारे पुढारी अजून बंगल्याच्या पायऱ्या उतरून खाली आलेले नाहीत. ग्रामसेवक, तलाठी सुद्धा गावात थांबलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणी वाली आहे का नाही असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या या निर्दयी वागणुकीमुळे शेतकरी संघटना संतप्त झाल्या आहेत. लवकरच शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून जाब विचारण्याच्या तयारीत आहेत.

गेल्या वर्षी कोरड्या दुष्काळाशी सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना यावर्षी पावसाने जून महिन्यात सुरुवात केल्यामुळे थोडासा धीर आला होता. शेतकऱ्यांनी माहागामोलाचे बियाणे खरेदी करून जून महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यात काळ्या आईची ओटी भरली. बियाणे खते खरेदी करण्यासाठी खिशात दमडी नसलेल्या शेतकऱ्यांनी सावकाराकडून व्याजाने पैसे काढले. बँकांनी पीक कर्ज दिलं नाही आणि शासनाने कर्जमाफीची भुलथापा देऊन वेळ मारून नेली. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारावरच अवलंबून राहावा लागलं. थोडा थोडा पाऊस पडत गेला. शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने जिद्दीन पिकाची मशागत केली आणि पीक चांगलं जोमात आलं. पिकाला आवश्यक तेवढा पाऊस पडत असल्यामुळे वडवणी, माजलगाव, अंबाजोगाई, केज, परळी, आष्टी, पाटोदा, गेवराई, शिरूर, बीड या तालुक्यात पिकांनी चांगलाच डेरा धरला होता. आता यावर्षी आपल्याला चांगले पीक उत्पादन मिळणार याची आशा शेतकऱ्यांना लागली होती. बीड जिल्ह्यासोबतच मराठवाड्यातील परभणी, जालना, हिंगोली, नांदेड, छत्रपती संभाजी नगर, धाराशिव, लातूर, जालना या जिल्ह्यातील शेतामध्ये सुद्धा सोयाबीन कापूस कांदा यासारख्या पिकांनी शेती भरून आली होती. शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होतं. पोळ्याचा सण शेतकरी आनंदात साजरा करण्याचे नियोजन करत होते. कापसाच्या झाडाला ७०–८० बोंड लगडलेली होते. सोयाबीनचे पीक कमरेला लागत होते. आणि सोयाबीन जर पदरात पडली असती तर हेक्टरी ३० ते ३५क्विंटल सोयाबीन होईल अशी परिस्थिती शेतकऱ्यांमध्ये निर्माण



झाली होती. शेतकऱ्यांना वरचेवर हुरुप येत होता. त्यामुळे महागडी औषधे घेऊन शेतकरी फवारणी देखील करत होते काही दिवसात सोयाबीनचे पीक पदरात येऊन पडणार होते. कापसाच्या पिकाची पहिली वेचणी अवघ्या पंधरा वीस दिवसांत होईल अशी परिस्थिती होती. मात्र निसर्गाला हे पाहवलं नाही. अण् पुन्हा एकदा बीड जिल्ह्यावर आणि मराठवाड्यावर कहर झाला. एक सप्टेंबरला पाऊस आला. एकच धिंगाणा मांडला आणि होत्याचं नव्हतं झालं. संपूर्ण बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार उडाला. नदी नाले एक झाले. शेतातील बांध भुईसपाट झाले. सोयाबीन, कापसाने जमिनीवर लोळण घेतलं. कांदा पिक तर पहायाला देखील शिल्लक राहिले नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. बीड जिल्ह्यातील वडवणी,धारूर, माजलगाव, अंबाजोगाई, केज, बीड, गेवराई, परळी या तालुक्यात अतिवृष्टी झाली. जिल्ह्यातील ६५ महसूल मंडळापैकी सात–आठ मंडळ सोडली तर प्रत्येक मंडळामध्ये ६५ मी मी पेक्षा जास्त पाऊस झाला. वडवणी तालुक्यातील दोन्ही मंडळात तर १०० री ओलांडली. काही मंडळ असे आहेत ज्या मंडळात पावसाचा आकडा दीडशेहून वर दिसून येत आहे. या पावसामुळे केवळ पिकाचेच नुकसान झालं नाही तर अनेक शेतकऱ्यांच्या शेती सुद्धा खरडून गेल्या. अनेक शेतकऱ्यांचे एवढे नुकसान झाले की ती नुकसान भरपाई मागण्या पलीकडे आहे. एवढे नुकसान होऊन देखील प्रशासनाला त्याचं काहीही देणे घेणे नाही. अद्यापही बीड जिल्ह्यात आणि मराठवाड्यात कोणत्याही गावात अधिकारी आणि शासनाचा प्रतिनिधी पोहोचलेला नाही. कोणत्याही गावात अद्याप पंचनामे सुरू झालेले नाहीत. कृषिमंत्र्यांनी मोठ्या आवाजामध्ये पंचनामे करण्याचे आदेश दिले असले तरी ते आदेश नेमके कुठे अडकून पडलेत याचा अजूनही मेळ नाही. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुद्धा पंचनामे करण्याचे आदेश दिल्याचे सांगण्यात येत आहे मात्र कोणत्याही गावात अजून शासनाचा प्रतिनिधी पोहोचलेला नाही. शेतकऱ्यांसाठी मोठमोठ्या गप्पा मारणारा एकही पुढारी अजून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पोहोचलेला नाही. कृषी विभागातील मोठमोठ्या पगारा उचलणारे कर्मचारी अधिकारी शेतकऱ्यांचा फोन सुद्धा उचलायला तयार नाहीत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जगायचं कसं आणि कोणावर अवलंबून राहायचं हा मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे. त्यामुळे शासन, प्रशासनाच्या या निगरगट्ट कारभाराविरुद्ध शेतकरी संघटना संतप्त झालेल्या आहेत शेतकरी संघटनेचे नेते कॉम्रेड जगदीश फरताडे यांनी संताप व्यक्त करताना शासनावर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यावर कडाडून टीका केली. तुम्ही शेतकरी संकटात असताना जर उपयोगात येत नसताल तर तुमचा विभाग काय कामाचा असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तुम्ही तात्काळ बांधावर येऊन शेतकऱ्यांना मदत करा शेतकऱ्यांना २४ तासाच्या आतमध्ये आर्थिक मदत देणे गरजेचे आहे अन्यथा शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून आवाज उठवेल असा इशाराही जगदीश फरताडे यांनी दिला आहे. त्यामुळे आता शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची वाट न पाहता बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पावले उचलून कोणतेही पंचनामे न करता तात्काळ शेतकऱ्याच्या खात्यात आर्थिक मदत करावी अशी मागणी गदर साप्ताहिकाच्या वतीने आम्हीही करत आहोत.

### तलाठी, ग्रामसेवक कृषी सहाय्यक बेपत्ता

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात पावसाने हाहाकार मांडला असताना प्रशासनाचे गाव पातळीवर काम करणारे महत्त्वाची भूमिका बजावणारे कर्मचारी तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक या तिन्ही कर्मचाऱ्यांपैकी एकही कर्मचारी बहुतांश गावामध्ये गेलेच नाहीत. अनेक गावांमध्ये जीवीत हानी झाली. घरांच्या पडझडी झाल्या. शेतांचे मोठे नुकसान झाले. आर्थिक फटका मोठ्या प्रमाणात बसला. मात्र याची खबर घेणारे शासनाचे हे महत्त्वपूर्ण कर्मचारीच या गावात उपलब्ध नसल्यामुळे याची माहिती प्रशासनापर्यंत अद्यापही मिळालेली नाही. मागील दोन–तीन दिवसात जे ग्रामसेवक, तलाठी आणि कृषी सहाय्यक गावात पोहोचले नाहीत त्या कर्मचाऱ्यावर प्रशासन काय कारवाई करणार असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### पीक नुकसान तक्रारीबाबत..!

गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून नदी, नाले ओढ्यांना पुर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. संततधार पाऊसामुळे आणि पुरामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीबाबत पीक विमा कंपनी आणि तहसीलदार यांच्याकडे तक्रार द्यावी. याबाबत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा. मी बुधवारी सायंकाळपर्यंत मुंबईहून परतल्यानंतर शेतकरी बांधवांना भेटणार आहे.

आ. प्रकाश सोळंके
माजलगाव विधानसभा

### पंचनाम्याचा दिखाऊपणा नको

शासन प्रशासन दरवेळी पंचनामे करते मात्र मदत देतच नाही. त्यामुळे पंचनाम्याचा दिखाऊपणा नको. बीड जिल्हा आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन,कापूस, कांदा, मुग हे महत्त्वाचे पिके वाया गेले आहेत.आता शेतकऱ्यांना दुसरं कोणतंही पीक आर्थिक परिस्थितीतून उभारी आणू शकत नाही. त्यामुळे शेतीचे पंचनामे करण्याचा राडा न घालता त्यांना आठ अ नुसार जमीनीला हेक्टरी ५० हजार रुपये मदत तात्काळ त्यांच्या खात्यावर शासनाने जमा करावी.

अँड राज पाटील
लढा दुष्काळाशी फाऊंडेशन बीड

### विविध ठिकाणी जीवित हानी

बीड तालुक्यात करपरा नदीमध्ये एका २१ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. गेवराई तालुक्यात एक बैल, एक गाय, वडवणी तालुक्यात एक गाय, धारूर तालुक्यात दोन म्हशी, एक गाय, केजमध्ये एक गाय, परळी तालुक्यामध्ये तीन म्हशी, आष्टीमध्ये एक बैल आणि पाटोदा तालुक्यात एक गाय दगावली आहेत. मराठवाड्यातील जिवीतहानीचा आकडा हा मोठा आहे. मात्र अधिकृत माहिती मिळालेली नाही त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी जीवितहानी झाली आहे त्या ठिकाणी मदत करणे गरजेचे आहे.

## पान एक वरून

**पूरग्रस्त भागातील नागरिकांना**

मोहिमेस सुरुवात करण्यात आली आहे. नाल्यात साचलेला कचरा काढण्यासाठी जेसीबीच्या दोन मशीन लावण्यात आल्या आहेत. आहे.सकाळी अकरा पर्यंत प्रशासनातील अधिकारी थांबून नागरिकांना स्थलांतरित करण्याच्या सूचना केल्या व नगरपालिकेने ३ ठिकाणी राहण्याची तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था केली आहे. मुसळधार पावसामुळे परळीतील सरस्वती नदीच्या पात्रात पूर आल्याने १००० कुटुंबाच्या घरात पाणी शिरले आहे. प्रशासनाने तातडीने भेट देऊन या भागातील नागरिकांना ३ ठिकाणी स्थलांतरित करण्याचे आवाहन केले तसेच या भागातील नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे करण्यासाठी १६ पथक नेमण्यात आले. या पथकात तलाठी नगरपालिका कर्मचारी असतील अशी माहिती परळी उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली. पूरग्रस्तांना नगर परिषदकडून तात्पुरत्या निवासाची व जेवणाची व्यवस्थापरळी शहरातील काही भागात मुसळधार पावसामुळे सरस्वती नदीच्या पात्रात पूर आल्याने १००० कुटुंबाच्या घरात पाणी शिरले आहे. नगर परिषद प्रशासनाने तातडीने भेट देऊन मदत कार्य सुरु केले आहे. पुरग्रस्ता कुटुंबाची शहरातील शाही फंक्शन हॉल, मिलिया हायस्कूल, मिलिंद नगर येथील बौद्ध समाज मंदिर या ३ ठिकाणीं तात्पुरत्या स्वरूपाच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांची तहसील कार्यालय मार्फत धन्य वाटप व नगरपरिषद कार्यालयामार्फत व्यवस्था करण्यात आली आहे.

**भोसले वस्तीवर मध्यरात्री**

बागलानी यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली व पंचनामा केला व पुढील अज्ञात चोराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आशी माहिती उपनिरीक्षक स्वापनिल कोळी, यांनी माहिती दिली तलवाडा पोलिसांना चोरांनी आव्हानच केले आहे. पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहेत

**उल्लेखनिय कार्याची**

ग्रामविकास अधिकारी मा . धनराज सोनवणे , ग्रामपंचायत सदस्य सौ . प्रतिभा काकडे , ज्ञानेश्वर पांचाळ , तसेच आदर्श शिक्षक नरहरी काकडे , पोपट काकडे , तानाजी आंडिल , हनुमंत परळकर , बालाजी जाधव , सौ .पुजा पांचाळ , सौ . स्वप्नाली जाधव , सौ . रूपाली परळकर , सौ . अनुराधा आंडिल. तसेच साबला ग्रामपंयतचे सर्व पदाधिकारी गावकरी उपस्थित होते.

**अपशब्द वापरले तर खपवून**

या नियोजीत दौऱ्याबाबत माहिती झाल्याने त्याने अशोक जिजाभाऊ गोजे यास गावातील नवीन बसस्थानका समोर आवाज देवून बोलावून घेतले व म्हणाला की, या वर्षी महिला सदस्या कुठे कुठे फिरायला जाणार आहेत, गेल्या वर्षीचा दौरा आदर्श ग्रा.पं. भेटीचा सांगून सरपंचाने गोव्याला फिरायला तुझ्या पत्नीस नेले त्या ठिकाणी त्यांनी कोणत्या प्रकारे अश्लील फोटो काढलेत ते फोटो मी पाहिलेत या वर्षी देखील तु तुझ्या पत्नीस व इतर महिला सदस्यांना सरपंचासोबत गोव्यालाच पाठविणार आहेस का? असे अशोक सोळंके याने अशोक गोजे यास चार चौघात म्हणून त्याने अशोक गोजे यांचे पत्नीबाबत आक्षेपार्ह, घाणेरड्या व अश्लील भाषेत अपशब्द बोलून माझी आई, पत्नी व इतर ग्रा.पं. महिला सदस्यांची चारचौघात बदनामी केली त्याबाबत अशोक गोजे याने अशोक सोळंके यास असे अपशब्द बोलू नका, चुकीची, खोटी माहिती गावात प्रसारीत करू नका जेणेकरून आमची गावात असलेली चांगली प्रतिष्ठा मलीन होवून गावात अशांतता निर्माण होईल अशी विनंती केली असता त्याने अशोक गोजे यास अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली व तुला काय करायचे ते कर तु माझे काही वाकडे करू शकत नाहीस असे म्हणाला त्यावेळी जवळच असलेले भगवान शेषेराव सोळंके व सुनिल आसाराम सोळंके यांनी अशोक बालासाहेब सोळंके यास समजावून सांगून खोटी बदनामी करू नका अशी समज दिली व अशोक गोजे त्या ठिकाणाहून घरी निघून जाण्याचे सांगितले.

दि.३१/०८/२०२४ रोजी दुपारी २.०० वा. गावातील काही लोकांकडून अशोक गोजे याचे कानावर पुन्हा अशोक बालासाहेब सोळंके यांनी त्याचे पत्नीची व ग्रा.पं. महिला सदस्यांची बदनामी केल्याबाबत कानावर आले. त्यामुळे अशोक गोजे हा माझ्याकडे माजलगाव येथे आला व मला वरील सर्व घटनाक्रम सांगितला. त्यावरून मी अशोक गोजे यास सांगितले की, सदर भेटी दौऱ्यात माझी आई व पत्नी ह्या देखील प्रत्यक्ष होत्या त्या केवळ आदर्श ग्रा. पं.भेटीसाठीच गेलेल्या होत्या, अशोक सोळंके याने काही सांगितले आहे ते साफ खोटे, चुकीचे व वस्तुस्थितीविरुध्द आहे, याबाबत माझे पत्नीचे मोबाईलमधील दौऱ्याचे छायाचित्रे अशोक गोजे यांना दाखवली व आपण अशोक सोळंके यांचे कडे जावून याबाबत लागलीच विचारणा करूत असे म्हणून मी, पत्नी वैशाली साळुंके व अशोक गोजे असे अशोक सोळंके यांचे माजलगाव येथील दुकानात गेलोत. त्या ठिकाणी अशोक सोळंके यांना आम्ही सर्वांनी वरील खोट्या बदनामी का करतात, सदर दौऱ्याच्या छायाचित्रे पाहा व सांगा आम्ही कोठे गेलो होतोत, याबाबतची खरी माहिती आपण मोहनराव काका व गावकऱ्यांना सांगूत तु आमचे सोबत चल असे म्हणालो असता अशोक सोळंके याने पुन्हा माझ्या आई व पत्नी बद्दल अर्वाच्च भाषा वापरु लागला व मी कोणाकडेही येणार नाही असे म्हणून तुझ्या कुटूंबाची व ग्रा.पं.ची यापुढे जास्तच बदनामी करणार असे म्हणाऱ्या अशोक सोळंके यांच्या विरोधात असा अर्ज सुशील सोळंके यांनी येथील उप विभाग पोलीस अधिकारी यांना दिला आहे. जर माझ्या आई ची , पत्नीची व महिला ग्रामपंचायत सदस्यांची कोणी अश्लील भाषा वापरत असेल तर मी खपवून घेणार नाही असे ही सुशील सोळंके यांनी बोलून दाखवले

**आता ब्राह्मण समाजासाठीही**

फडणवीस यांच्यासोबत ची बैठक ठरवण्यात आली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून लवकरात लवकर भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ हे ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या शिष्टमंडळात ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी,परळी वैजनाथ, विश्वजीत देशपांडे,पुणे,मनोज जोशी, लातूर, शैलेश कुलकर्णी, अंबेजोगाई, अजिंक्य पांडव, बीड , सचिन वाडे पाटील, संभाजीनगर,महेश दोरवट पाटील, संभाजीनगर,काकासाहेब कुलकर्णी, सोलापूर, संजय कुलकर्णी–सुपेकर, गंगाखेड,रमण उपाध्याय, जालना,डॉ. संजीवनी पांडे, मुंबई, विजया कुलकर्णी, संभाजीनगर सूर्यकांत देशमुख, बार्शी, शशांक खेर, डोंबिवली, आलोक चौधरी– सेलू, सौ. धनश्रीताई उत्पात, पंढरपूर आदीसह ब्राह्मण समाजातील प्रमुख समन्वयक पदाधिकारी उपस्थित होते.

## पान सहा वरून

**पाच विधानसभा मतदारसंघाची**

जिंकणार आहोत, यात कसलेही दुमत नाही तथापि, सर्वांनी सकारात्मकतेने कामाला लागावे असं आवाहन त्यांनी केलं.भाजपच्या विधानसभा प्रवास योजनेअंतर्गत चार दिवसांच्या दौऱ्यासाठी आ. पंकजाताईंचे दुपारी पुण्यात आगमन झाले. चिंचवड येथे आरंभ हॉल येथे बैठकीसाठी आगमन होताच त्यांचे जेसीबीतून पुष्पवृष्टी करत कार्यकर्त्यांनी वाजतगाजत जोरदार स्वागत केले. बैठकीच्या प्रारंभी आ. आश्विनी जगताप, पुणे शहर जिल्हाध्यक्ष शंकर जगताप यांनी त्यांचे स्वागत केले. माजी खासदार अमर साबळे, सदाशिव खाडे, महेश कुलकर्णी, माजी महापौर माईताई ढोरे, नामदेव डाके, ड. मोरेश्वर शेडगे आदी पदाधिकारी तसेच सुमारे दोनशे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**रशियाचा युक्रेनवर पुन्हा**

इमारतींचं मोठ नुकसान झालं आहे. या इमारतीच्या ढिगाऱ्या खाली नागरिक अडकले आहेत. यापैकी ३० जणांना बाहेर काढण्यात आलं आहे, तर ११ जण अद्यापही ढिगाऱ्याखाली अडकली असल्याची माहिती आहे. महत्त्वाचे म्हणजे मागील सात दिवसांत रशियाने युक्रेनवर केलेला हा चौथा हल्ला केला आहे. दरम्यान, युक्रेनकडून रशियाला प्रत्युत्तर दिलं जाण्याची शक्यता आहे.गेल्या दोन अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू आहे. आतापर्यंत रशियाने युक्रेनच्या मोठ्या भूभागावर ताबा मिळवला आहे. तर युक्रेनने रशियाचे अनेक हल्ले परतून लावले आहेत.

**नितेश राणेंची वाचाळ**

धार्मिक स्थळांबाबत बडेजावपणा करत अन्य धर्माच्या धार्मिक स्थळांचा अनादर करत आहेत. सातत्याने भाजपाचे आमदार नितेश राणे हे मुस्लीम धर्माच्या भावनांना ठेच पोहचविण्याचे काम जाणीवपुर्वक करत आहेत. काल–परवा त्यांनी जे वक्तव्य केलं आणि त्या वक्तव्यात धार्मिकस्थळाचा उच्चार केला. तो संतापजनक. होय, स्वत:च्या धर्माचा स्वाभिमान हा प्रत्येकाला असावा, परंतु दुसऱ्याच्या धर्माचा अनादर करण्याचा अधिकार इथे कुणालाच नाही. परंतु नितेश राणे सातत्याने वादग्रस्त वक्तव्य करत वाचाळवीर असल्याचे दाखवून देतात. शासनकर्ते त्यांना पाठिशी घालतात, त्याचा गैरवापर करत राणे सातत्याने धार्मिक द्वेष पसरवतात. मुख्यमंत्र्यांनी अशा वाचाळवीराचां तात्काळ बंदोबस्त करायला हवा. राणेंच्या बेताल बडबडीला भाजपानेही ब्रेक लावायला हवा. नितेश राणे ज्या पद्धतीने बरगळतात ती बडबड ही विखारी असते ती महाराष्ट्राला परवडणारी नाही म्हणून राणेंच्या बोलतींचा बंदोबस्त करा, अशी मागणी शेख तय्यब यांनी मुख्यमंत्र्यांसह गृहमंत्र्यांकडे केली आहे.

**स्व.विनायकराव मेटेंना**

विनायकराव मेटे यांना २०२० – २०२१ या वर्षाकरता महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाला आहे.

मराठा महासंघातून मराठा आरक्षण लढ्यात सामील झालेले दिवंगत मेटे २७ वर्षे विधान परिषदेचे सदस्य राहीले. सर्वाधिक वेळा विधान परिषद सदस्य म्हणून शपथ घेण्याचा त्यांचा विक्रम कायम आहे. मराठा आरक्षणाबरोबरच अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिवस्मारक, मुस्लिम आरक्षण, धनगर आरक्षण, शासकीय नोकर भरतीमधील वयाची अट, शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन, मराठा समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च व परदेशी शिक्षणाकरिता विद्या वेतन व मार्गदर्शनाकरिता सारथी या स्वायत्त संस्थेच्या स्थापनेची संकल्पनाही मांडण्यातही त्यांचा पुढाकार होता.त्याद्वारे असंख्य विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला. पोलीस भरतीतील उमेदवारांसाठी वयोमर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. या बाबतच्या मागण्यांसाठी आपल्या आक्रमक आणि अभ्यासू भाषणाने दिवंगत विनायकराव मेटे यांनी कायम विधीमंडळाचे सभागृह दणाणून सोडले. या मागण्यांसाठी त्यांनी रस्त्यावरचीही लढाई लढली. दरम्यान, १४ ऑगस्ट २०२२ रोजी मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बोलविलेल्या बैठकीला जाताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. परंतु, त्यांच्या कर्तृत्वाचा उत्कृष्ट संसदपटू या पुरस्काराने त्यांच्या पश्चात् सन्मान झाला त्यांच्या पत्नी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

**निवडणुक तोंडावर गाजर**

जर एमआयडीसी झाली तर खूपच फायदेशीर होणार आहे. मोठ्या हायवेवर ही एमआयडीसी होईल आणि या भागातील बेरोजगार तरुणांना उद्योग उभे करता येतील त्यांच्या हाताला काम मिळेल, परंतु नेमकी निवडणुकीतच याचर त्यांनी लक्ष वेधण्याचा केज तालुक्यातील जनतेचा प्रयत्न केल्यामुळे हे काम खरंच होणार आहे की हे निवडणुकीचे गाजर आहे असीही चर्चा होत आहे.

**परळी येथील पूरग्रस्तकरांच्या**

प्रतिसाद निधी देण्याची कार्यवाही करणे त्याचबरोबर नाथ प्रतिष्ठान च्या वतीने घरात–संसारात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचनाही धनंजय मुंडे यांनी दिल्या आहेत.यावेळी त्यांच्यासोबत परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नगरपालिकेचे उपमुख्यअधिकारी संतोष रोडे, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे , राहुल ताटे,तखी खान आदी उपस्थित होते. शहरातील नरहरी मंदिर , गंगासागर , खुदबेनगर ,इंदिरानगर ,रहिमत नगर ,मिलिंद नगर भिमानगर, बरकत नगर ,शाही फंक्शन हॉल, आंबेवेस परिसरास भेट देवून तेथील नुकसानग्रस्त भागाची पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. नुकसानग्रस्त भागात प्रशासनाचे पथक सर्वे करीत आहे अशी माहिती उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली. त्यानंतर धनंजय मुंडे हे परळी–अंबाजोगाई तालुक्यातील पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी रवाना झाले होते.

**जुन्या घटनेतून युवकाचा**

करत होते. रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते. पोलिस अधीक्षक कार्यालयात नातेवाईकांनी आक्रोश करत आरोपीला तात्काळ अटक करा अशी मागणी केली आहे.आरोपीच्या शोधासाठी विशेष शोध पथक व फिंगरप्रिंट पथक देखील पांढरवाडी येथे दाखल झाले होते. या घटनेचा तपास जलदगतीने पोलिस करीत आहेत. मयताचे वडील नामे भगवान घरगुडे यांच्या विरूद्ध तलवाडा पोलिस ठाण्यात अंदाजे एक ते दीड वर्षापूर्वी दोन बालकांना उंदीर मारण्याचे औषध देऊन जिवे मारल्याचा गुन्हा दाखल आहे. याच घटनेचा राग मनात धरून आरोपी अमोल सुखदेव भावले व त्यांच्या साथीदारांनी मंगळवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बालाजी भगवान घरगुडे यांच्या अंगावर चाकूने सपासप वार करून खून केला आहे. जुन्या घटनेचा संदर्भ डोळ्यासमोर ठेवून हि खूनाची घटना घडल्यामुळे खून का बदला खून अशी चर्चा लोकांकडून दबक्या आवाजात ऐकायला मिळत आहे. आरोपीच्या शोधासाठी पोलिस अधीक्षक बीड यांनी विशेष शोध पथक रवाना केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सोयगाव तालुक्यात अतिवृष्टीचा तडाखा

## अस्मानी : फुल पात्यावर आलेली पिके वाहून गेली

जरंडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरासह तालुक्यात सोमवारी रात्रीही सोयगाव आणि जरंडी या दोन मंडळांना अतिवृष्टीचा तडाखा बसला आहे त्यामुळे या परिसरातील सोयगाव ची सोना, जरंडीची खडकी,बहुला,सुकी नदी गलवाडा नदी या पाच नद्यांनी रात्रभर पूर मुळे धोक्याची पातळी गाठली होती दरम्यान जरंडी शिवारातील श्रीराम शेणफडू मोरे यांचा एक बैल पूराच्या पाण्यात वाहून गेल्या ची घटना घडली मंगळवारी सकाळी थेट चिमणापूर धरणाच्या कडेला दगवलेल्या अवस्थेत आढळून आला आहे.सोमवारी दिवसा आणि रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयगाव सह २४ गावांच्या शिवारातील पिके झोपली असून वेताळवाडी,गलवाडा सोयगाव जरंडी,निंबायती आणि घोसला या गावांमध्ये खरिपाच्या पिकांची माती झाली असून पूराच्या पाण्यात जमिनी खरडून कपाशी,सोयाबीन मका ही पिके वाहुन गेली आहे ऐन फुल पात्यावर आलेली कपाशीची पिके वाहून गेली आहे वाघूर नदीच्या पूराच्या पाण्याचा फटका सावर खेडा गावाला बसला आहे या शिवारातील कपाशी, मका आणि सोयाबीन पिके पूर्णपणे



उध्वस्त झाली आहे निंबायती,घोसला शिवारात पूराच्या पाण्यात शेत जमीनी खरडुन वाहून गेल्या मुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे रणजित उगले यांचे घोसला शिवारात दोन एकर क्षेत्र वाहून गेले दरम्यान सोयगाव व जरंडी मंडळात झालेल्या सलग दोन दिवसांचा अतिवृष्टी च्या नुकसानीची संयुक्त पंचनामे अद्यापही प्रशासनाने हाती घेतले नाही

सोयगाव आणि जरंडी मंडळात झालेल्या अतिवृष्टी च्या नुकसानीची प्राथमिक अहवाल तालुका कृषी विभागाने अद्याप दिलेला नाही त्यामुळे ३३ टक्क्यांच्या वरील पिकांची नुकसानीची आकडेवारी स्पष्ट नाही अहवाल प्राप्त होताच महसूल कडून नुकसानीची पाहणी करण्यात येईल सर्व तलाठ्यांना सतर्क राहण्याचा सूचना दिल्या आहे

मनीषा मेने जोगदंड
तहसीलदार सोयगाव

सोयगाव आणि जरंडी मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांनी तातडीने पीकविमा कंपनी च्या पोर्टल वर ७२ तासांच्या आत तक्रार नोंदवावी तसेच पीकविमा न भरलेल्या शेतकऱ्यानी तालुका कृषी कार्यालयात ऑफ लाईन तक्रार नोंदवावी बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्याचा सूचना कृषी सहायक यांना दिल्या आहेत

मदन शिदोदिया
तालुका कृषी अधिकारी सोयगाव

# उपजिल्हाधिकारी संवर्ग सेवाज्येष्ठता वाद सर्वोच्च न्यायालयात निकाली

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य प्रशासकीय सेवेतील उपजिल्हाधिकारी संवर्ग सेवाज्येष्ठता वाद सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निकाली काढीत काही पदोन्नत उपजिल्हाधिकाऱ्यांच्या गटाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका सुनावनी घेत फेटाळून लावली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा ८ ऑगस्टचा निकाल कायम ठेवत उपजिल्हाधिकारी सेवा जेष्ठता यादीचा वाद अंतिमरित्या संपुष्टात आला आहे. या निकालाचा परीणाम म्हणून आता त्यामुळे उपजिल्हाधिकारी यांच्या पदोन्नत्या होऊन महसूल विभागातील प्रशासकीय शिथीलता दूर होणार आहे.

उपजिल्हाधिकारी संवर्गामध्ये उपजिल्हाधिकारी पदावर येण्याचे दोन मार्ग आहेत. एक प्रत्यक्ष एमपीएससी द्वारे परीक्षा देऊन सरळसेवा म्हणून येतात व दुसरे हे तहसीलदार या पदावरून पदोन्नती घेऊन येतात.उपजिल्हाधिकारी संवर्गात ६५ टक्के पदोन्नत तहसीलदार हे उपजिल्हाधिकारी असले पाहिजे तर ३५ टक्के हे प्रत्यक्ष सरळसेवा उपजिल्हाधिकारी असले पाहिजे असे प्रमाण ठरलेले आहे. परंतु गेल्या काही वर्षात नियमाप्रमाणे ठरलेले हे प्रमाण न पाळता जास्तीचे तहसीलदार संवर्गातून उपजिल्हाधिकारी पदोन्नत केले गेले आणि त्यामुळे सरळसेवा उपजिल्हाधिकारी यांच्यावर व त्यांच्या पदोन्नतीवर यामुळे गंभीर परिणाम झाला. यामुळे उपजिल्हाधिकारी यांची पदोन्नती होऊन अप्पर जिल्हाधिकारी होण्याचा कालावधी हा २० ते २२ वर्षे एवढा वाढला होता. यावर मार्ग काढून शासनाने सेवाजेष्ठता यादी बनवताना या जास्तीच्या पदोन्नत केलेल्या तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील ज्येष्ठता क्रमांक दिला आहे.

शासनाने नियमानुसार केलेल्या या कारवाईने व्यथित होऊन काही पदोन्नत उपजिल्हाधिकारी हे सुरुवातीला मॅट औरंगाबाद येथील न्यायालयात गेले. तेथे त्यांच्या विरोधात निकाल लागल्यानंतर ते पुन्हा उच्च न्यायालय-औरंगाबाद खंडपीठात गेले. तेथेही प्रकरण विरोधात गेल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती.



माजलगाव: राष्ट्रकुल संसदीय मंडळ ,महाराष्ट्र शाखेतर्फे दिला जाणारा, पुरस्कार राष्ट्रपती यांच्या शुभहस्ते स्वीकारताना आ.प्रकाश दादा सोळंके आदी.

## शिष्टमंडळाकडून अतिवृष्टीची पाहणी!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरासह परिसरात दोन दिवसांच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मंगळवारी भाजपचे शिष्टमंडळाने सोयगावात पाहणी केली यावेळी शहरातील घरांच्या नुकसानीची व पिकांची नुकसानीची पाहणी करून तातडीने पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची बुधवारी भेट घेणार असल्याचे भाजपचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर यांनी शेतकऱ्यांना पाहणी दरम्यान सांगितले सोयगावसह तालुक्यातील काही गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले ,त्याठीकाणी अद्यापही प्रशासनाने पंचनामे हाती घेतले नव्हते त्यामुळे भाजप चे शिष्टमंडळाने पाहणी करून संबधित अधिकार्यांना नुकसान भरपाई साठी पंचनाम्याच्या सुचना केल्या.यावेळी सुरेश बनकर, अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी , जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर मोठे, सुनिल गव्हांडे, सुनिल ठोंबरे,विशाल गिरी ,मयुर मनगटे आदिंसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोयगावात शांतता कमिटीची बैठक

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात यंदाच्या गणेशोत्सवसाठी गणेश मंडळांनी एक गाव एक गणपतीची संकल्पना राबविण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करा, गणेशोत्सवात सामाजिक,धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करावेत मात्र याचवेळी सोयगावकरांनी शांततेची परंपरा कायम राखावी कुठलेही गालबोट लागु देऊ नये उत्सव शांततेत साजरा करून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.दिनेशकुमार कोल्हे यांनी मंगळवार दुपारी दोन वाजता सोयगाव येथे आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत केले.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक.पंकज बारवाल यांनी प्रास्तविक केले होती. ,गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरीता पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विविध सुचना करताना जबरदस्तीने कोणाकडुनही वर्गणी मागु नये,सर्व नियम कायद्यांची माहिती देऊन सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोष्ट दिसुन आल्यास कायदा हातात न घेता पोलीसांकडे संपर्क साधावा,महिलांना सन्मानाची वागणूक द्यावी,ईतर स्वच्छतेबाबत काळजी घेतानाच ध्वनी प्रदुषणाबाबतही काळजी घ्यावी तसेच मंडळाचे ठिकाणी दाखविण्यात येणारे देखावे आक्षेपार्ह अगर सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच गणेशमंडपामुळे रहदारीस अडथळा होणार नाही,गणेश मंडळाचे ठिकाणी स्वयंसेवक नेमुन मंडळांच्या पदाधिका-यांनी त्यावर नियंत्रण ठेवावे.आदि सुचना करण्यात आल्या याचवेळी पदाधिका-यांनी मांडलेल्या समस्या संदर्भात माहिती घेऊन आवश्यक उपाययोजना बाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.यावेळी बैठकीत सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,.दिलीप पवार,राजू बरडे,गजानन दांडगे,रवींद्र तायडे,पवन तायडे,अजय कोळी,विनोद सपकाळ,पोलीस पाटील अंबादास ढगे,बाली चव्हाण,नाना चौधरी,श्रीराम जाधव,मुलचंद पवार,सोयगाव शहरातील नगरसेवक हर्षल काळे,नगरसेवक संदीप सुरडकर,राजू माळी,कृष्णा जुनघुरे पाटील,रवींद्र जावळे,अर्जुन गुजर,राहुल पवार,ईश्वर राठोड, श्रीराम जाधव,प्रदिप जोहरे, मंगलदास अहिरे,ओम बावस्कर,अतुल चौधरी,किरण महाले,तेजस काळे,महेश पवार,चेतन पवार,गोपाल पवार,निलेश नागपुरे,वैभव लवटे,आदिंसह गणेश मंडळाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष पदाधिकारी,उपस्थित होते.

# बस सेवा बंद ठेवून संप

## आंदोलन: प्रवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या वाहक चालक कर्मचाऱ्यांनी मंगळवारी रोजी सकाळपासून विविध मागण्यासाठी बस सेवा बंद ठेवून संप पुकारला असून या संपामुळे विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय निर्माण झाली आहे. दरम्यान या आंदोलनात पैठण येथील आगारातील लांब पल्ल्याच्या व ग्रामीण भागातील ७० बस फेऱ्या बंद ठेवून चालक वाहक कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतल्याची माहिती पैठण आगार प्रमुख गजानन मडके यांनी दिली आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या वाहक चालक कर्मचाऱ्यांनी शासनाच्या कर्मचाऱ्याप्रमाणे महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सवलत लागू करून प्रलंबित मागण्यासाठी मंगळवारी रोजी बस बंद ठेवून संप पुकारला आहे. यामुळे पोळ्याच्या सणा साजरा करण्यासाठी शहरी भागातील वास्तव्यास असलेले



शेतकरी प्रवासी या निमित्त गावाकडे येऊन हा सण साजरा करून दुसऱ्या दिवशी शहराला जातात मात्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवा बंद केल्याने या प्रवाशासह शेतकऱ्याची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. यामध्ये अनेक शासकीय कार्यालयाचे दररोज अपडाऊन करणारे अधिकारी कर्मचारी यांचा समावेश असल्याने शासकीय कार्यालयात देखील कर्मचाऱ्यांची उपस्थितीवर मोठा परिणाम झाला आहे.

# नुकसान भरपाई देण्याची मागणी

## भास्कर रोडे : मुसळधार पावसाने मोठे नुकसान

परळी/पुण्यभूमी प्रतिनिध



काल नुकत्याच झालेल्या जोरदार अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची उभी पिके उध्वस्त झाली असून शहरातील तसेच ग्रामीण भागातील अनेक नागरिकांच्या घरात पाणी घुसल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. अशा सर्व नुकसानग्रस्तांना पंचनामे न करता राज्य शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी असे आवाहन रिपाईचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मराठवाड्यात गेल्या चार दिवसापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. परळी तालुक्यातील व शहरातील,ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे जीवन विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन व कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. तर परळी शहरात अनेक नागरी वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार उपयोगी साहित्य पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे. त्यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच पुराच्या पाण्यामुळे आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या वतीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पिकाचे पंचनामे न करता सरसकट क्षेत्रानुसार त्यांना आर्थिक मदत करावी. याबरोबरच परळी शहरातील आणि ग्रामीण भागातील ज्या नागरिकांचे अतिवृष्टीमुळे घरांची पडझड आणि नुकसान झाले आहे. घरातील संसारोपयोगी साहित्य नष्ट झाले आहे अशा सर्व नागरिकांनाही सरकारच्या वतीने तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी रिपाईचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे, मराठवाडा अध्यक्ष प्रा. दासू वाघमारे, बीड जिल्हा सचिव दशरथ शिंदे आदींनी केले आहे.

# नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी!

## भारत हजारे: शेतीसह घरांचे मोठे नुकसान

तेलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या चार दिवसापासून होत असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतातील उभ्या पिकासह हजारे वस्तीत मोठ्या प्रमाणावर पाणीच पाणी झाले सर्व घरांना समोर तळ्याचे स्वरूप आले होते त्यामुळे घरात ठेवलेल्या अन्नधान्य सह इतर संसर्ग उपयोगी साहित्याची नासाडी झाली त्यामुळे रहिवाशी हवालदार असून सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते भारत हजारे यांनी केले आहे. मौजे लोणगाव तालुका माजलगाव या ग्रामपंचायत अंतर्गत हजारे वस्ती असून मागील चार दिवसात सततचा पाऊस



अतिवृष्टी झाल्याने येथील सर्वच घरात पाणी साठल्याने घरात साठवून ठेवलेले अन्नधान्याचे पोते व इतर संसार उपयोगी साहित्य भिजून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने आता काय करायचे आणि काय खायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या या नुकसानीचे प्रशासनाने पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत घोषित करावी अशी मागणी सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते भारत हजारे व इतरांनी केली असून लखन हजारे अंकुश हजारे कपिल सोनकांबळे अशोक हजारे करण हजारे यांच्यासह अनेकांचे नुकसान झालेले आहे.

## नईम अत्तार : प्रशासनास दिले कारवाई करण्याचे निवेदन

# निर्णय घेतला पण मुख्यालयी कोणीच थांबेना!

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

-तालुक्यातील पात्रुड येथील जि.प.च्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षक मुख्यालयी हजर राहत नसल्याने त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करुन निलंबित करण्यात यावे अशी मागणी पालक तथा पत्रकार नईम आत्तार यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी, बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी ते ज्या गावातील शाळेवर अधयाने काम करतात त्यांनी त्या मुख्यालयीच राहणे बंधनकारक आहे, पण माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील जि.प.च्या प्राथमिक व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत. तर त्यांचा सुख सोईने शहराच्या ठिकाणी राहुन शासन




निर्णयाचे उलंघन करत आहेत. त्यांना मुख्यालयी राहण्याची वारंवार विनंती केली होती पण त्यास प्रतिसाद दिला नाही. यावर केंद्र प्रमुख संजय कुलकर्णी यांच्या कडे वारंवार तोंडी तक्रार केली होती त्यांनी हि काहिच निर्णायक भुमीका न घेता त्या तक्रारींची दखल न घेता सर्वांनाची पाठराखण केली आहे.

शासनाच्या धोरणा प्रमाणे सर्व शिक्षकांना मुख्यालयी राहण्यासाठी शिक्षकांच्या वेतनानुसार त्याची १०टक्के रक्कम घरभाडे म्हणुन दरमहा अदा करण्यात येते. मात्र पात्रुड येथील शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मुख्यालयी न राहता शासना कडुन देण्यात येणारे घरभाडे घेऊन शासनाची फसवणुक करीत आहेत करीता त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करुन निलंबित करण्यात यावे. तसेच त्यांची पाठराखण करणारे केंद्र प्रमुख संजय कुलकर्णी यांना निलंबित करण्यात यावे निवेदनाची दखल घेऊन कार्यवाही न झाल्यास १०सप्टेंबर रोजी जिल्हा शिक्षण अधिकारी, बीड कार्यालया समोर अमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनात शेवटी दिला आहे.

# केज मतदार संघात निवडणूक वारे

## रोहन गलांडे : खबरदार पाटलांच्या नावाचा वापर कराल तर

केज/पुण्यभूमी प्रतीनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे तरी भावी आजी माजी उमेदवार मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांना भेटुन आले आहेत तसेच केज अंबाजोगाई मतदार संघातील काही भावी उमेदवार असे पन आहेत मराठा आरक्षणात काही योगदान नाही पन आता पाटील आठवत आहेत तरी उमेदवारांनी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या नावाचा वापर करु नये कारण मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी केज अंबाजोगाई मतदार संघात कुठल्याही भावी उमेदवाराला आर्शिवाद वगैरे काही दीलेले नाहीत असे मराठा सेवक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तसेच मतदार संघात काही भावी उमेदवार आम्हाला मराठा




योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आर्शिवाद दीले आहेत व मनोज दादा जरांगे पाटील आमच्या पाठीशी आहेत व मराठा योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांनी आम्हाला विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काम करण्यासाठी सांगितले आहे अशी खोटी माहिती मराठा बांधवांना सांगुन विधानसभेला सहकार्य करा मतदार करा असे बोलून खेड्यापाड्यातील मराठा बांधवांची दिशाभूल करण्यात येत आहे तरी केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाती भावी उमेदवारांनी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने जोगवा मागु नये असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तसेच मराठा बांधवांनी सुध्दा जोपर्यंत आपले मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांचा आदेश दिला जात नाही तोपर्यंत कुठल्याही उमेदवारांच्या भुलथापाने भुलुन जाऊ नये व केज अंबाजोगाई मतदार संघासाठी आपले मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांचा आदेश देतील त्यांच्या आदेशानुसार आपन सर्वानी कामाला लागु असे सर्व मराठा बांधवाच्या चरणी नतमस्तक होऊन विनंती करतो असे मराठा सेवक अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी


# माढा तालुक्यातील मोडनिंब बाजारात उडदाला मिळाला सर्वोच्च भाव



वृत्तसंस्था

**मोडनिंब / सोलापूरः** माढा तालुक्यातील मोडनिंब बाजारात उडदाची आवक वाढली आहे. प्रतिक्विंटल दर ८,२५० रुपये मिळत असल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

मोडनिंब येथील कृषी उत्पन्न उपबाजार समितीच्या आडत बाजारमध्ये १६०० पिशव्यांची आवक झाली होती.

माढा तालुक्यातील मोडनिब, अरण, जाधववाडी, बैरागवाडी, तुळसी, भेंड भागातून, मोहोळ तालुक्यातील शेटफळ, तेलंगवाडी, खंडाळी, सिद्धेवाडी, पंढरपूर तालुक्यातील बार्डी, करकब, जाधववाडी, रोपळे या भागातून शेतकऱ्याचा माल मोडनिंबला येत आहे.

सध्या दर ही स्थिर असल्यामुळे शेतकरी वर्गामधून उत्साही वातावरण दिसत आहे. याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पोपटलाल दोभाडा यांनी सांगितले की यंदाच्या वर्षी पाऊस वेळेवर झाल्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली असली तरी दर स्थिर आहेत.

येणाऱ्या काळात पाऊस थांबल्यानंतर बाजारात आणखी आवक वाढेल. त्यामुळे व्यापाऱ्यांसह शेतकरी आनंदात आहेत.

# पंतप्रधान मोदींकडून कोल्हापूरच्या युवकाचे कौतुक

## मराठीतून साधला संवाद

**कोल्हापूर :** पालघर येथील वाढवण बंदराच्या पायाभरणी कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोल्हापूरच्या आदित्य राजेंद्र खैरमोडे या युवकाचे कौतुक केले. खैरमोडे याने सादर केलेल्या प्रात्यक्षिकांचे कौतुक करीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'तुम रोजगार लेनेवाले नही, देनेवाले बनो,' अशा शब्दांत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. त्यानंतर त्याच्यासोबत मराठी भाषेतून संवाद साधला.



मोदी यांनी खैरमोडेंसी तुम्ही कोल्हापुरातून आलात काय, अशी मराठी भाषेतून संभाषणाला सुरुवात केली. त्यांनी पाणी पुनः वापर, मत्स्यपालन प्रणालीची माहिती त्यांच्याकडून घेतली. महाराष्ट्रातील मत्स्यविकास विभागाने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत निवडलेल्या कोल्हापूर, विरार, लातूर, नांदेड येथी लाभार्थ्यांची संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार यांनीही आदित्य खैरमोडे यांचा भाषणात विशेष उल्लेख करीत त्याच्या व्यवसायाची माहिती सांगितली. आदित्य हा कोल्हापुरातील जवाहरनगरातील असून, त्याने बी.एस्सी नंतर मत्स्य व्यवसायात झोकून दिले. त्याने गारगोटी परिसरातील पाल येथे प्रकल्प उभारला. त्यासाठी त्याचे वडील राजेंद्र खैरमोडे यांचे प्रोत्साहन लाभल्याचे सांगितले. दरम्यान, आदित्य यांनी हा प्रकल्प दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जादा उत्पन्न मिळवून देणारा असल्याचे सांगून टँकमधील मत्स्य शेतीची माहिती दिली.



## दोन्ही राज्यातील सहा जिल्ह्यांना रेलसेवेने जोडणार

## मार्ग २०२८-२९ पर्यंत होणार पूर्ण

# मुंबई-इंदूर नवीन रेल्वे प्रकल्प मंजूर

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** मुंबई आणि इंदूर या दोन प्रमुख व्यावसायिक केंद्रांना जोडणाऱ्या ३०९ किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वे मार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील दोन आणि मध्य प्रदेशातील चार जिल्ह्यांना रेलसेवेने जोडले जाईल, ज्यामुळे या भागातील व्यापार वाढेल. या प्रकल्पाचा एकूण खर्च १८,०३६ कोटी असून, तो वर्ष २०२८-२९ पर्यंत पूर्ण होईल.

हा प्रकल्प मल्टी-मोडल कनेक्टिव्हिटीसाठी पीएम-गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनची फलश्रुती असून, जे एकात्मिक नियोजनाद्वारे शक्य झाले आहे तसेच या प्रकल्पाद्वारे नागरिकांना, वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीसाठी अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करेल.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांमधील या प्रकल्पाअंतर्गत सहा जिल्ह्यांचा समावेश असेल आणि भारतीय रेल्वेच्या सध्याच्या जाळयामध्ये सुमारे ३०९ किलोमीटरची भरही पडेल. या प्रकल्पामुळे ३० नवीन स्थानके बांधली जातील. नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पामुळे सुमारे १,००० गावे आणि सुमारे ३० लाख लोकसंख्येला जोडली जाऊ शकतील.

या प्रकल्पामुळे देशाच्या पश्चिम/नैऋत्य भागाला मध्य भारताशी जोडणारा एक लहान मार्ग उपलब्ध करून देऊन या प्रदेशातील पर्यटनालाही चालना मिळेल. या नव्या रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशातील पर्यटक विविध पर्यटन व धार्मिक स्थळांना सहजरित्या भेट देऊ शकतील, ज्यामुळे या प्रदेशातील पर्यटन क्षेत्रात लक्षणीय वाढ होईल.

या प्रकल्पामुळे पीथमपूर ऑटो क्लस्टरला (९० मोठे कारखाने आणि ७०० लघू आणि मध्यम उद्योग) जेएनपीएच्या गेटवे बंदराला आणि इतर राज्य बंदरांना थेट जोडणी होऊ शकेल. मध्य प्रदेशातील बाजरी उत्पादक जिल्हे आणि महाराष्ट्रातील कांदा उत्पादक जिल्ह्यांना थेट संपर्क प्रदान करू शकतील, तसेच देशाच्या उत्तर आणि दक्षिण भागात त्याचे वितरण सुलभ होईल.

कृषी उत्पादने, खते, कंटेनर, लोह खनिज, पोलाद, सिमेंट, पीओएल इत्यादी वस्तूंच्या वाहतुकीसाठी हा एक आवश्यक मार्ग आहे. क्षमता वाढीच्या कामामुळे सुमारे २६ एमटीपीए (वार्षिक दशलक्ष टन) अतिरिक्त मालवाहतूक होईल रेल्वे हे पर्यावरण स्नेही आणि ऊर्जा कार्यक्षम वाहतुकीचे साधन आहे.

# रामराजे निंबाळकर यांचे महायुतीतून बाहेर पडण्याचे संकेत

## अजित पवारांना पुन्हा धक्का?



**सातारा :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. त्यातच अजित पवार गटाचे आमदार रामराजे निंबाळकर यांनी नाराजी व्यक्त करत महायुतीतून बाहेर पडण्याचे संकेत दिलेत.

रणजितसिंह निंबाळकर आणि जयकुमार गोरे यांच्यासोबतच्या संघर्षातून रामराजे निंबाळकर यांनी हे विधान केले आहे.

भाजपाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि जयकुमार गोरे यांच्याविरोधातील तक्रारीची भाजपाने दखल घ्यावी अशी मागणी रामराजेंनी केली आहे. साताऱ्यात कार्यकर्त्यांसमोर रामराजे निंबाळकर बोलत होते.

त्यावेळी ते म्हणाले की, आपली काय भारतीय जनता पार्टीसोबत भांडणे आहेत का? तर नाही, आपण हिंदुत्व मुसलमान करतो का?, आपण गाई कापतो त्याला प्रोटेक्शन देतो का? आपली फक्त तक्रार रणजिंतसिंह नाईक निंबाळकर आणि त्यांचे सहकारी हे गल्लोगल्ली दहशत करतात. त्यांच्या दहशतीला आमचा विरोध आहे. त्याला भाजपाने साथ देऊ नये एवढीच खरी आपली तक्रार आहे असे त्यांनी सांगितले.

तसेच याबाबत वरिष्ठांना सांगून बघू, तुम्ही तयारीने या. महिलांना येऊद्या. आपण एक तास वेगळा कार्यक्रम घेऊ आणि विषय संपवून टाकू, जरी उद्या काही फरक झाला नाही तर आपल्याला तुतारी वाजवायला किती वेळ लागतोय. आता अजून काय बोलायचे राहिले का? असे सांगत रामराजे नाईक निंबाळकरांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तुतारी हाती घेण्याचेही संकेत दिले आहेत. त्यामुळे रामराजे निंबाळकर हे सध्या समरजितसिंह घाटगे, हर्षवर्धन पाटील यांच्या रांगेत आहेत का, असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.



# हिंदुस्थानातील लघु उद्योगांवरही चीनचे अतिक्रमण

## जीटीआरआयचा अहवाल

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** चीनच्या सीमेवरील कुरघोड्या, घुसखोरी याबद्दल विरोधाचे शाब्दीक बुडबुडे सोडण्यासही कचरणाऱ्या केंद्र सरकार आणि भाजपच्या कचखाऊ वृत्तीमुळे चीनने हिंदुस्थानातील स्थानिक छोटे व्यावसायिक आणि उत्पादकांनाही देशोधडीला लावले आहे. छत्र्या, खेळणी, विशिष्ट प्रकारचे कापड आणि संगीत वाद्ये यांसारख्या वस्तूंची चीनमधून होणारी वाढती आयात रोखण्यासाठी काहीही पावले न उचलणाऱ्या निष्क्रिय केंद्र सरकारमुळे हीच उत्पादने बनवणाऱ्या स्थानिक लघु आणि मध्यम व्यावसायिक रस्त्यावर आले आहेत.

हिंदुस्थान आणि चीन यांच्यातील आयात-निर्यात यातील तफावत प्रचंड असून हा एकूण व्यवहार हिंदुस्थानसाठी आतबट्ट्याचाच ठरला असल्याचे ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (जीटीआरआय) या उद्योग क्षेत्राशी संबंधित थिंक टँकने म्हटले आहे.

# लाच न दिल्याने नर्सने प्रसूती करण्यास दिला नकार

## महिलेची बाथरुममध्ये प्रसूती होऊन नवजाताचा मृत्यू

**ईशानगर(मध्य प्रदेश) :** मध्य प्रदेशात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. लाच न दिल्याने परिचारिकेने एका गर्भवतीची प्रसूती करण्यास नकार दिला. तिच्या या लाचारीपणामुळे महिलेने बाथरुममध्येच मुलीला जन्म दिल्याने जमिनीवर पडून नवजाताचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात एकच संताप पसरला आहे.

मध्य प्रदेशात भ्रष्टाचाराची प्रकरणे सातत्याने वाढत आहे. लाच घेण्याचे प्रमाणही वाढले आहे. ही घटना ईशानगर येथील आहे. एक आदिवासी कुटुंब गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी ईशानगर आरोग्य केंद्रात घेऊन गेले होते. त्यावेळी आरोग्य केंद्रात ड्युटीवर असलेली परिचारिका प्रीति प्रजापतीने महिलेच्या कुटुंबियांकडे २ हजार रुपयांची लाच मागितली. मात्र महिलेच्या कुटुंबाची परिस्थिती नसल्याने त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यावर परिचारिका संतापली आणि तिने प्रसूती कळांनी विव्हळत असलेल्या महिलेची प्रसूती करण्यास नकार दिला. त्यानंतर वेदनेने कळवळत असलेल्या महिलेने बाथरुममध्येच बाळाला जन्म दिला आणि नवजात बाळ जमिनीवर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. नवजाताच्या मृत्यूनंतर कुटुंबियांनी परिचारिकेविरोधात तक्रार दाखल केली आहे. परिचारिकेने कर्तव्य बजावताना गर्भवती महिलेला मदत केली असती तर कदाचित या परिस्थितीत तिच्या मुलीला आपला जीव गमवावा लागला नसता, असेही सांगितले. लाचखोरीमुळे नवजात मुलीचा मृत्यू झाल्याची तक्रार कुटुंबीयांनी ईशानगर पोलिस ठाण्यात दिली. या प्रकरणी आता त्या परिचारिकेचे निलंबन करण्यात आले आहे.

ही घटना उघडकीस आल्यानंतर आरोग्य विभागानेही तत्काळ कारवाई करत परिचारिका प्रीती प्रजापती यांना तत्काळ निलंबित केले. आरोग्य विभागाचे प्रादेशिक संचालक यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. याशिवाय ड्युटीवर असलेल्या डॉक्टर आणि बीएमओच्या चौकशीचेही आदेश देण्यात आले आहेत.

# केजरीवालांच्या पीएला सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

## स्वाती मालीवाल मारहाण प्रकरण



वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पीए बिभव कुमार याला सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर कथित हल्ल्याप्रकरणी बिभव कुमारला अटक करण्यात आली होती. या प्रकरणानंतर मुख्यमंत्री केजरीवाल आणि आम आदमी पक्षाला भाजपने लक्ष्य केले.

जानेवारी महिन्यात बिभव कुमारला ताब्यात घेण्यात आले होते. स्वाती मालीवाल यांनी बिभव कुमार याच्यावर मारहाणीचा आरोप केला होता. सीएम हाऊसमध्ये आपल्याला मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला होता. नंतर स्वाती मालीवाल यांनी या प्रकरणाची तक्रार दिल्ली पोलिसांकडे केली आणि एफआयआर दाखल केला. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी बिभव कुमारला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. मुख्यमंत्री कार्यालयापासून दूर राहण्याचे आदेश

न्यायालयाने बिभव याला मुख्यमंत्री कार्यालयापासून दूर राहण्याचे आदेश दिले आहेत. महत्त्वाच्या आणि संवेदनशील साक्षीदारांची साक्ष पूर्ण होईपर्यंत बिभव कुमार याला मुख्यमंत्री कार्यालयात प्रवेश न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय, ते कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी खटल्याच्या सुनावणीबाबत कोणतेही भाष्य करणार नाहीत, अशी अट देखील घालण्यात आली आहे.

साक्षीदारांच्या सुरक्षेची खात्री करण्यासाठीच या अटी घातल्या आहेत आणि कोणत्याही दबावाशिवाय त्यांची साक्ष घेता येईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

# आसाम तृणमूल काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा राजीनामा

**गुवाहाटी :** आसाम तृणमूल काँग्रेसचे (टीएमसी) अध्यक्ष रिपुन बोरा यांनी रविवारी पक्षाचा राजीनामा दिला. रिपुन बोरा यांनी टीएमसीचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांना राजीनामापत्र पाठवून दिले आहे. या पत्रात त्यांनी पक्षाच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आसाममध्ये टीएमसी स्वीकार्य बनवण्यासाठी अनेक सूचना दिल्या होत्या; परंतु त्या सूचनांची अंमलबजावणी झाली नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच गेल्या दीड वर्षांपासून मी ममतादीदींना भेटू शकलो नाही, याचे शल्यही सातत्याने जाणवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ईशान्येकडील राज्यातील लोक टीएमसीला पश्चिम बंगालचा 'प्रादेशिक पक्ष' मानतात आणि ते आपला पक्ष म्हणून स्वीकारण्यास तयार नाहीत, असा दावाही त्यांनी केला आहे.

# वैष्णोदेवी यात्रेच्या मार्गावर दरड कोसळली

## दोन भाविकांचा मृत्यू, अनेक यात्रेकरू अडकले



**कटरा :** वैष्णोदेवी यात्रेच्या मार्गावर एक मोठी दुर्घटना घडली आहे. पदयात्रा जिथून जाते त्या भागात दरड कोसळली आहे. या दुर्घटनेत दोन यात्रेकरूंचा मृत्यू झाला आहे. एक भाविक जखमी असून काही यात्रेकरू अडकले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेनंतर प्रशासनाने मदत व बचावकार्य हाती घेतले आहे. जेणेकरून परिस्थिती नियंत्रणात आणता येईल. तसेच यात्रेकरूचा मार्ग मोकळा होईल. दरम्यान, जखमी झालेल्या यात्रेकरूवर प्राथमिक उपचार करून त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, प्रशासनाने यात्रेकरूंना सतर्कतेचे आवाहन केले आहे. तसेच सर्वत्र लक्ष ठेवून मार्गक्रमण करण्यास सांगितले आहे. भूस्खलनानंतर यात्रेचा मार्ग बंद आहे.

# लखनौ विद्यापीठात १९ वर्षीय विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू

**लखनौ :** उत्तर प्रदेशात लखनौमधील राममनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या वसतिगृहात अनिका रस्तोगी या १९ वर्षीय विद्यार्थिनीचा मृतदेह सापडला आहे. वसतिगृहाच्या खोलीत संशयास्पद स्थितीत विद्यार्थिनी बेशुद्धावस्थेत आढळून आली. तिला रुग्णालयात हलवले असता मृत घोषित करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास सुरू करण्यात आला आहे. अनिका ही एलएलबीच्या तिसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी असून ती आयपीएस संतोष रस्तोगी यांची मुलगी आहे.

# गोमांसाची तस्करी करणारे पोलिसांच्या जाळ्यात

## ३२ किलोहून अधिक गोमास जप्त

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील आंबेडकरनगर येथील दोन कट्टरपंथींना गोहत्या केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. दिलशाद बेग आणि अरबाज अशी गोहत्या केलेल्या कट्टरपंथी आरोपींची नावे असून आरोपींनीकडून तपासात पोलिसांनी ३२ किलो २०० ग्रॅम गोमांस, एका बंदूक, काडतुसे आणि लोखंड वस्तू, दुचाकी, मोबाईल जप्त केला. दिलशाद आणि बेग अशी आरोपींची नावे असून शनिवारी ३१ ऑगस्ट २०२४ रोजी घडलेल्या घटनेत सहभागी असलेला सलमान आणि मोहम्मद शाह याचा मुलगा गुडनू फरार आहे. छापा टाकण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरही आरोपींनी गोळीबार केला होता. फरार आरोपीच्या शोध सुरूआहे. माहितीनुसार, ही घटना उत्तर प्रदेशातील आंबेडकर जिल्ह्यातील इब्राहिम पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे.



**चेन्नई :** तामिळनाडू सरकार राज्यातील १८ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या नागरिकांसाठी कॅन्सर तपासणी अनिवार्य करणार असल्याची माहिती राज्याचे आरोग्यमंत्री सुब्रमण्यम यांनी दिली आहे. राज्यातील एरोडू, तिरुपत्तूर, रानीपेट आणि नगरसोल जिल्ह्यांमध्ये कॅन्सरच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे एका सर्वेक्षणात दिसून आले आहे.

# बांगलादेशात हिंदूंच्या नोकऱ्या अडचणीत

## ५० शिक्षकांना राजीनामा देण्यास भाग पाडले





वृत्तसंस्था

**ढाका :** बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर हिंदूंना निशाणा बनवले जात आहे. आता तर सरकारी शाळांमध्ये शिकवणाऱ्या हिंदू शिक्षकांना बळजबरीने राजीनामा द्यायला भाग पाडले आहे. आतापर्यंत ५० शिक्षकांना राजीनामा द्यायला भाग पाडल्याचे समोर आले आहे.

स्थानिक वृत्तानुसार, २९ ऑगस्ट रोजी विद्यार्थी आणि बाहेरच्या काही लोकांनी बरिशाल येथील बेकरगंज सरकारी महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका शुक्ला राणी हलदर यांच्या कार्यालयात धाव घेऊन त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडले. बरेच तास धमकावल्यानंतर हलदर यांनी साध्या कागदावर मी राजीनामा देत असल्याचे लिहून नोकरी सोडली. याआधी १८ ऑगस्टला अजीमपूर गव्हर्नमेंट गर्ल्स स्कूल आणि कॉलेजच्या ५० विद्यार्थिनींनी शाळेच्या मुख्याध्यापिका गितांजली बरुआ यांना घेरले. त्यांच्याकडून सहाय्यक मुख्याध्यापक गौतम चंद्र पॉल आणि शारिरिक शिक्षाच्या शहनाजा अख्तर यांच्या राजीनाम्याची मागणी केली. गितांजली बरुआ म्हणाल्या त्यांच्या कार्यालयावर हल्ला करत त्यांना अपमानास्पद वागणूक दिली.

# आंध्र, तेलंगणात धुवाधार; 24 तासांत 8 जणांचा मृत्यू



**चेन्नई :** आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. अनेक भागात पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. आंध्रातील विजयवाडा येथे गेल्या २४ तासांत भूस्खलनात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर गुंटूरमध्ये कालव्यात ३ जण बुडाले. तेलंगणातील केसमुद्रम ते महबूबाबाद दरम्यान रेल्वे ट्रॅक वाहून गेला. यासंबंधीचा व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यामध्ये उद्ध्वस्त झालेला रेल्वेट्रॅक दिसत आहे.

रेल्वेमार्ग उखडल्यामुळे दिल्ली-विजयवाडा मार्गावरील सर्व गाड्या थांबवण्यात आल्या आहेत. आंध्र आणि तेलंगणातून जाणाऱ्या सुमारे ६ गाड्या रद्द करण्यात आल्या असून ९ अन्य मार्गांनी वळवण्यात आल्या आहेत. तेलंगणात आज सोमवारी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली होती. या इशाऱ्यामुळे सोमवारी सर्व शाळा बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात आला आहे. आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथेही ५ दिवस जोरदार पाऊस कोसळण्याचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश-राजस्थानमध्ये सप्टेंबरच्या सुरुवातीपासूनच पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. पूर आणि भूस्खलनाची शक्यताही हवामान खात्याने व्यक्त केली आहे. गुजरातमध्येही पावसाचा जोर कायम असून वडोदरा येथे मगरी निवासी भागात घुसण्याचे प्रकार वाढले आहेत.

# ६ ओलिसांची हत्या, इस्त्रायलमध्ये संतापाची लाट

देशोन्नती वृत्तसंकलन


**नवी दिल्लीः** दहशतवादी संघटना हमासने ओलिस ठेवलेल्या ६ इस्त्रायली नागरिकांची डोक्यात गोळया झाडून हत्या केल्याचे रविवारी निदर्शनास आले. गाझामध्ये एका इस्त्रायली-अमेरिकन तरुणासह सहा ओलिसांचे मृतदेह बाहेर काढले. या घटनेची माहिती मिळताच इस्त्रायलमधील लाखो नागरिक युद्धविरामासाठी रस्त्यावर उतरले. ओलिसांची हत्या झाल्याने ईस्त्रायली नागरिकांमध्ये सत्तातपाची लाट उसळली आहे. इस्त्रायली लष्कराने गाझा पट्टीत सहा ओलिसांचे मृतदेह बाहेर काढल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. हमाससोबत बंधक-युद्धविराम करार करावा, अशी जनतेची आग्रही मागणी आहे. 'टाईम्स ऑफ इस्त्रायल'च्या वृत्तानुसार, तेल अवीवमध्ये ३००,००० हून अधिक लोक जमले होते.

आंदोलकांनी अब-अबच्या घोषणा दिल्या. उर्वरित ओलिस नागरिकांना सुखरुप घरी आणण्यासाठी हमाससोबत युद्धविराम करण्याचे आवाहन त्यांनी पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना केले. निदर्शकांनी इस्त्रायली झेंडे, पिवळ्या फिती आणि ओलिसांच्या सन्मानार्थ सहा खून झालेल्या ओलिसांची माफी मागणारे फलक हातात घेऊन रस्त्यावर उतरले होते.

### कामगार संघटनांचा संप

गाझामध्ये सहा ओलिसांच्या मृत्यूनंतर इस्त्रायलच्या सर्वात मोठ्या कामगार संघटनेने आज (दि. २ सप्टेंबर) देशभरात सर्वसाधारण संप पुकारला आहे. आरोग्य, वाहतूक आणि बँकिंग यासारख्या क्षेत्रातील ८००,००० कामगारांचे प्रतिनिधित्व करणारी ट्रेड युनियन हिस्ताद्रुत यांनी सांगितले की, सोमवारी सकाळी संप सुरू होईल. गाझामध्ये हमासने ओलिस ठेवलेल्या उर्वरित लोकांना परत आणता यावे यासाठी युद्धविरामासाठी सरकारवर दबाव वाढवणे हा या संपाचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### लाखो नागरिक युद्धविरामासाठी रस्त्यावर



# हरित महामार्ग विकासात भर टाकणार!

## धोरण : खा.बजरंग सोनवणेंच्या पत्राला नितीन गडकरींचा हिरवा कंदील

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

दळणवळण सोयीस्कर होण्यासाठी सुरत-चेन्नई हरित महामार्ग प्रकल्प भारत सरकार अंतर्गत बांधला जात आहे. हा प्रस्तावित महामार्ग महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, बीड, धाराशिव आणि सोलापूर अशा पाच जिल्ह्यांमधून जातो आहे.त्यामुळे बीड जिल्ह्यातून गेलेल्या महामार्गांना सुरत-चेन्नई हरित महामार्ग जोडला गेल्यास त्याचा फायदा होईल. त्याचबरोबर मराठवाड्याचा दुष्काळी भाग परराज्यांना जोडला जाईल. त्यामुळे दळणवळण करण्यास चालना मिळेल.आशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक तथा महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना दिले होते. त्या पत्राला त्यांनी हिरवा कंदील दाखविला आहे.बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी, भारत सरकार प्रस्तावित सुरत-चेन्नई रहित महामार्ग संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र दिले होते.त्यामध्ये त्यांनी मागणी केली होती की, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातून सुरत-चेन्नई हरित महामार्ग जात आहे,मात्र बीड जिल्हा मुख्यालय ठिकाणापासून लांब अंतरावर आहे.या प्रकल्पामध्ये अरणगाव तालुका



जामखेड येथे वाहने चढण्यास व उतरण्यास सुविधा देण्यात आली आहे. या ठिकाणापासून जामखेड-खर्डा-चौसाळा- माळेगाव येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ला सुपर दिला गेला तर मराठवाड्याच्या दळणवळणाला अधिक चालना मिळेल.अविकसित मानल्या जाणाऱ्या भागाला विकासाची जोड निर्माण होईल. तसेच चौसाळा येथे बीड जिल्हा मुख्यालय ठिकाणाला जोडला जाईल.त्यामुळे केज, माजलगाव, धारूर येथील रस्त्यांचे जाळे तयार होईल.अशी मागणी केली होती. सुरत-चेन्नई महामार्ग हा साळेगाव येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ पासून नांदूरघाट पुढे चौसाळा येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ येडशी छत्रपती संभाजी नगरला जोडून पुढे खरडा ते दिघोळ फाटा पैठण पंढरपूर पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ इतरला जोडून जामखेड अरणगाव येथून अंदाजीत लांबी ८६ किमी होईल.यामधील काही किलोमीटर लांबीचे रस्ते हे राष्ट्रीय महामार्ग दर्जाचे आहेत व काही लांबीचे रस्ते हे राज्य महामार्ग असून त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन ते त्याचे रुंदीकरण हे दोन लेन पेव्हड शोल्डरमध्ये करावे. कारण बीड शहर व बीड जिल्ह्यातील केज, धारूर, माजलगाव तालुक्यासाठी सुपर कनेक्टिव्हिटीचे काम करेल.

अशी कनेक्टिव्हिटी तयार झाल्याने मराठ्यातील मागास मानल्या जाणाऱ्या भागाला विकसित होण्यासाठी मदत होईल आणि हा भाग राज्याशी जोडला जाईल.अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली होती.त्या मागणीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हिरवा कंदील दाखविला आहे.त्यामुळे बीडच्या विकासात आणखीन भर पडली जाणार आहे.

# तलवाडा झेडपी शाळेला तलावाचे स्वरूप

## दुर्लक्ष: शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हाल



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा व परिसरात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असून तलवाडा महसूल मंडळात १३०.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या संततधार पावसामुळे शेतीचे व पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. तलवाडा जि.प.मा.शाळा व कन्या प्रशाला परिसरात पावसामुळे तलावाचे स्वरूप प्राप्त झाले असून विद्यार्थ्यांना शाळेत जाणे अवघड झालं आहे.

तलवाडा ग्रामपंचायत या ज्ञान मंदिरा कडे लक्ष देतील का आशा प्रशन सामान्य नागरिकांना पडला आहे. शाळेच्या परिसरात मोठया प्रमाणात पाणी साचले असून ते पाणी आता बाहेर कसे काढायचे असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हे पाणी शाळा परिसराच्या बाहेर काढण्यासाठी ग्रामपंचायतीने तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी पालकांनी केली आहे. गावातील काही प्रमुख रस्त्यांवर देखील अशाप्रकारे पाणी साचल्यामुळे येण्याजाण्याची अडचण निर्माण झाली आहे. पावसामुळे शाळा परिसरात तयार झालेला हा तलाव विद्यार्थी व शिक्षकांना डोकेदुखी ठरू लागला आहे.

# पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदतकार्य

## धनंजय मुंडे:पालिकेकडून निवारा,जेवणाची व्यवस्था



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोमवारी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे शहरातून वाहणाऱ्या सरस्वतीनदीच्या पात्राला पूर येवून अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे तारांबळ उडाली. ही माहिती कळताच मंगळवारी पहाटे परळीच्या उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर व नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व नगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी तातडीने पोहोचले व नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली .तेथील नागरिकांना स्थलांतरित करण्याच्या दृष्टीने मदत कार्य केले आहे. शहरातील पूरग्रस्त भागातील नागरिकांना नगर परिषदकडून मदत कार्य सुरु केले आहे. पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी पुरग्रस्त भागाची केली पाहणी केली. पूरग्रस्तांना निवारा, जेवणाची नगर परिषदकडून व्यवस्था करण्यात आली.

आंबेवेस भागातील पुलावरून पाणी वाहू लागले आहे. हे पाणी शहरातील, मिलिंद नगर, बरकत नगर, इंदिरानगर, भिमानगर , कृष्णा नगर, गोपाल टॉकीज रोड,आंबेवेस , रहेमत नगर ,गंगासागर नगर , कुरेशी नगर,भुई गल्ली, सिद्धार्थ नगर, सर्वे नंबर ७५ मधील घरात आज मंगळवारीपहाटेपाच वाजता पाणी शिरलेआहे.जवळपास १००० कुटुंबाच्या घरात पाणी घुसून घरातील संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. या भागातील घरात चार फूट पाणी साचले . व अनेकांच्या घरात चीखल झाला आहे. पहाटे साडेपाच वाजता परळी चे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नगरपालिका मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे , अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन स्वच्छता विभागाचे शंकर साळवे, सुनील आदोडे यांनी भेट देवून पाहणी केली. तसेच मदत कार्य सुरु केले आहे.नगरपालिकेच्या वतीने या ठिकाणी स्वच्छता

पान २ वर...

### पूरग्रस्त भागात भेट देऊन केली पाहणी

परळी शहरात मुसळधार पावसाने निर्माण झालेल्या पुर परिस्थितीचा फटका अनेक भागातील नागरिकांना बसला आहे. पूरग्रस्त भागाची कृषीमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सर्व भागाची पाहणी करून प्रशासनास सूचना दिल्या. यावेळी नगर परिषद व तहसील प्रशासनाचे अधिकारी उपस्थितीत होते.

# भोसले वस्तीवर मध्यरात्री दरोडा

## भयभित: चोर सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे तीन दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावुस चालु आहे. मध्यरात्री तलवाडा गेवराई रोडवरील समर्थ विद्या इंग्लिश स्कूल वर आठ ते दहा चोरांनी घेराव घातला होता खोलीमध्ये प्रवेश केला व लहान लहान मुलं झोपेतून उठले व रडत बसले होते त्यांना त्यांच्या पाल्यांनी दिलेले बिस्किट व खाऊ व त्यांचे पेट्या उचका उचकी करून वह्या पुस्तकाची नासधुस केली शाळेतील एक कुत्रा त्यांना भोकत असताना त्यांनी कुत्र्याला मारून टाकले व लहान बाळ रडत असताना त्यांना खायला बिस्किट दिले व चोरांनी सुद्धा बिस्कीट खाल्ले, टीव्हीएस कंपनीची नवीन मोटरसायकल घेऊन शाळेतील चालू होत नसल्याने पाठीमागच्या वड्यात फेकून दिली व



गाडीची मोड तोड करून मोठे नुकसान केले त्यानंतर भोसले वस्तीवरील गोरख मराठे, यांच्या घरात प्रवेश केला असता शांतबाई गोरख मराठे, या महिलेला महारण करून व लहान एक वर्षाच्या बाळाच्या गळ्यातील सोन्याचे ओम, व त्या महिलेच्या मंगळसूत्र कानातले, व अनेक वस्तू मुबाईल, मारहाण करुन दीड ते दोन लाख रुपयांची घरफोडी झाली असल्याची माहिती समोर येत आहे.

समर्थ विद्यामंदिर शाळेतील सीसीटीव्ही फुटेज मध्ये चोर कैद झाले या घरफोडीची माहिती सपोनि सोमनाथ नरके,यांना मिळताच तात्काळ पंचनामा करण्यासाठी उपनिरीक्षक स्वप्निल कोळी, वाहन चालक

पान २ वर...

# पावसाने पीकांचे अतोनात नुकसान!




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाचीवाडी मधिल एडकावस्ती परिसरात संततधार पावसामुळे शेतीचे खूप नुकसान झाले आहे.या परिसरात पावसाचा जोर वाढल्याने शेतीची स्थिती खूपच बिकट झाली आहे, ज्यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान कापूस, सोयाबीन, तुर, मुग, उडीद बाजरी या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पावसामुळे पाण्याचे तळे तयार झाले आहे,ज्यामुळे पिकांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात दिसून येतो. शेतकऱ्यांचे कष्ट आणि आर्थिक नुकसानीची तीव्रता विचारात घेता, ही परिस्थिती खूपच गंभीर आहे.प्रशासनाकडे मागणी केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथिल शेतकरी नागरीकांनी प्रशासनाकडे पिकांच्या पंचनाम्याची मागणी केली आहे. गणनांकडे पाठवलेली तक्रारींची संख्या वाढलेली आहे आणि शेतकरी पंचनाम्याच्या माध्यमातून मदतीची अपेक्षा करत आहेत.पंचनामा होऊन नुकसानभरपाई मिळावी या उद्देशाने त्यांनी ही मागणी केली आहे.

# माजलगावमध्ये स्त्री रूग्णालयास मान्यता

## दिलासा:आ.प्रकाश सोळंके यांची माहिती



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगावात २८ कोटी ६८ लक्ष रूपयांचे साठ खाटांचे स्त्री रूग्णालयास मान्यता मिळाली असुन सहा महिण्याच्या कालावधीत रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

शहरामध्ये स्त्री रूग्णालय नसल्याने महिलांना इतर ठिकाणी उपचारासाठी जावे लागत होते. यामध्ये महिलांची मोठी परेशानी होती. त्यामुळे माजलगाव शहरात स्वतंत्र स्त्री रूग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी होती. याची दखल घेत आ. प्रकाश सोळंके यांनी या रूग्णालयाबाबत शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यामुळे रूग्णालयाची मागणी शासनाच्या विचाराधीन होती. दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला असुन साठ खाटांचे स्त्री रूग्णालय मुख्य इमारत बांधकामास २८ कोटी ६८ लक्ष रूपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे माजलगाव शहरात स्त्री रूग्णालय उभारण्यात येणार असुन सहा महिण्यांमध्ये स्त्री रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आ. प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

# उल्लेखनिय कार्याची यथोचित दखल!

## अभिनंदनिय : सरपंच जनाबाई काकडेंचा सन्मान

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील साबला गावचे सरपंच, नेहमीच समाज कार्यात अग्रेसर असणाऱ्या, स्वतःला झोकून देवून समाजकार्य करणाऱ्या तसेच गावात वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम घेणे , शैक्षणिक कार्यक्रम घेणे गाव माझा मी गावाचा याप्रमाणे गावात प्रत्येक रविवारी स्वच्छता अभियान राबवणे तसेच , राष्ट्रपुरुषांची जयंती , पुण्यतिथी साजरी करणे . गावातील सर्वांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे , लहान मुलांना , मुलींच्या मनामध्ये शिक्षणाबाबत आवड निर्माण करणे अशा प्रकारचे वेगवेगळे उपक्रम राबऊन एक आदर्श सरपंच म्हणून ज्यांनी अल्पावधीतच एक स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या , केज तालुक्यातील साबला या खेडेगावाची ओळख अगदी राज्याच्या पटलावर करून बीड जिल्हयातील एक आदर्श महिला




सरपंच म्हणून ज्यांनी नाव लौकीक मिळवला अशा सरपंच सौ.जनाबाई काकडे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच राजर्षी शाहू प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र आयडॉल या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पुणे - दक्ष मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य , राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्र आयडॉल पुरस्कार २०२४ या कार्यक्रमात या पुरस्कार सोहळ्याचे वितरण करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.ना. मुरलीधर (अण्णा ) मोहोळ ( केंद्रिय हवाई उड्डाण व सहकार राज्यमंत्री भारत सरकार ) व शुभहस्ते मा. शिवानी नाईक , मराठी अभिनेत्री ( अप्पी आमची कलेक्टर ) आयोजक - मा. भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर ( संस्थापक अध्यक्ष - राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठाण / संपादक , जागृत शोध ) यांच्या प्रमुख उपस्थितीत साबला गावच्या सरपंच सौ जनाबाई नरहरी काकडे , यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार देवून यांचा सन्मान करण्यात आला.अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी

पान २ वर...

## बाजीराव धर्माधिकारी : विशेष बैठकीत दिले आश्वासन

# आता ब्राह्मण समाजासाठीही महामंडळ!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी विविध स्तरातून सरकार दरबारी पाठपुरावा केला जात आहे. यामध्ये प्रामुख्याने ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे ही मागणी लावून धरण्यात आलेली आहे. राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या संदर्भाने ब्राह्मण समाजाच्या शिष्टमंडळाची विशेष बैठक घेऊन चर्चा केली. अमृत योजना कायम ठेवून येत्या कॅबिनेटमध्ये आर्थिक विकास महामंडळाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले असल्याची माहिती ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिलीआहे. गेल्या अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या या जिव्हाळ्याच्या




प्रश्नांची लवकरच सोडवणूक होणार असून या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहावर आज ब्राह्मण समाज शिष्टमंडळाशी विशेष बैठक घेऊन चर्चा केली. परळी येथे झालेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेतील मुख्य ठराव म्हणून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी एकजुटीने मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने राज्यात समाज बांधवांच्या वतीने विविध स्तरावर आंदोलने, निवेदने व आपापल्या स्तरावरून शासन दरबारी पाठपुरावा केला गेला. परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐक्य परिषदेत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सरकारच्या वतीने सकल ब्राह्मण समाजाला याबाबत समन्वयक म्हणून आपण भूमिका पार पाडू असा शब्द दिला होता. त्या अनुषंगाने सरकार दरबारी याबाबतचा पाठपुरावा सुरू होता. ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संस्थापक बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी सातत्याने सरकार दरबारी याबाबत पाठपुरावा केला. त्याचप्रमाणे विविध ठिकाणी समाज बांधव उपोषणाला बसले होते. त्यावेळीही वेळोवेळीही ना.धनंजय मुंडे यांनी सकारात्मक भूमिका घेत ब्राह्मण समाजाला आश्वासित केले होते. तीच भूमिका पार पाडत सरकारच्या स्तरावर हा प्रश्न सोडवण्यासाठीही धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून ब्राह्मण समाज शिष्टमंडळाची उपमुख्यमंत्री देवेंद्र

पान २ वर...

# अपशब्द वापरले तर खपवून घेणार नाही

## सुशील सोळंके : सादोळा ग्रामपंचायत चर्चेचा विषय

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील सादोळा येथील ग्रामपंचायत काराभरावरून काल मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे यात सुशील सोळंके यांच्या सह काही जनावर माजलागाव शहर पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे या वरून सुशील सोळंके यांनी गावातील अशोक सोळंके यांच्या विरोधात उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कडे तकरार देऊन कायदेशीर कार्यवाहीची मागणी करत जर कोणी आमच्या आई ,पत्नी व ग्रामपंचायत महिला सदस्या विरोधात अपशब्द वापरत असेल तर मी कदापि खपऊन घेणार नाही असे सुशील सोळंके यांचे म्हणणे आहे

सुशील सोळंके यांनी सदरील प्रकरणी दिलेल्या अर्जात



म्हंटले आहे की, माझी आई सन २०२२-२७ या कालावधी करीता सार्वत्रिक ग्रा.पं. निवडणुक सादोळा येथून जनतेतून सरपंच म्हणून निवडुन आलेली आहे. सदर ग्रा.पं.चे सरपंच व इतर आकरा सदस्यांची सादोळा ग्रा. पं.असून त्यापैकी दहा सदस्य व सरपंच ह्या सर्व महिला आहेत. सन २०२३ चे महिला सरपंच माझी आई यांनी स्वखर्चाने ग्रा. पं. मधील महिला ग्रामसेवक, सर्व महिला सदस्य व गावातील इतर महिला यांना आदर्श ग्रा.पं.चे गावे भेटीसाठी घेवून गेल्या होत्या. सदर भेटी दरम्यान येणारे देवस्थानचे दर्शन देखील त्यांनी नियोजीत केले होते. त्याच अनुषंगाने सन २०२४ ला देखील गावातील महिला सरपंच माझी आई यांनी त्यांना शासनाद्वारे आलेल्या मानधनातून स्वतः माझी आई, माझी पत्नी, महिला सदस्य व इतर महिला यांना इतर राज्यातील आदर्श ग्रामपंचायतीचे भेटीसाठी व जितिरुपती दर्शनचे नियोजन केले होते. दि.२९/०८/२०२४ रोजी रात्री ९.३० वा.दरम्यान आमचे गावातील अशोक बालासाहेब सोळंके यांना

पान २ वर...